रविवार, १२ जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३२५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## नॉर्वेतील बुद्धिबळ स्पर्धेत ग्रँडमास्टर प्रज्ञानंद विजेता



**नवी दिल्ली** : भारताचा १६ वर्षीय ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंदने नॉर्वे खुल्या बुद्धिबळ स्पर्धेच्या अ गटात व्ही प्रणितला पराभूत करीत विजेतेपद पटकावले आहे. या स्पर्धेत प्रज्ञानंदने सुरुवातीपासून चांगला खेळ करून दाखवला. त्याने प्रणितबरोबरच व्हिक्टर मिखालेव्हस्की (आठवी फेरी), विटाली कुनिन (सहावी फेरी), मुखमदझोखिद सुयारोव (चौथी फेरी), सेमेन मुतुसोव्ह (दुसरी फेरी) आणि मॅथियास अनेलँड (पहिली फेरी) यांचा पराभव केला, तर त्याने खेळलेले इतर तीन सामने अनिर्णित राहिले. स्पर्धेत सातत्याने विजयी कामगिरी करीत प्रज्ञानंदने सर्वाधिक ७.५ गुण मिळवले. दरम्यान, प्रज्ञानंदने याआधीही ऑनलाइन बुद्धिबळ स्पर्धेत जगातील सर्वोत्तम असणाऱ्या मॅग्नस कार्लसनला पराभूत केले होते. प्रज्ञानंद अलिकडच्या काळात जागतिक स्पर्धांमध्ये दर्जेदार कामगिरी करताना दिसत आहे.

अंतरंग
‘ठाकरेंच्या माफिया सरकारची उलटी गिनती सुरू’/२
खालापुरात शिवसेना आणि राष्ट्रवादी आमनेसामने!/७
पनवेलमध्ये स्केटबोर्डिंग स्पर्धेला खेळाडूंचा प्रतिसाद/८

# महाविकास आघाडीला जबर धक्का

## राज्यसभा निवडणुकीत भाजपचे तिन्ही उमेदवार विजयी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेने सहाव्या जागेसाठी उमेदवारी दिलेले कोल्हापूरचे संजय पवार यांचा पराभव झाला असून भाजपचे धनंजय महाडिक यांचा विजय झाला आहे. त्यामुळे भाजपचे तीन, तर शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या पक्षांचा प्रत्येकी एक सदस्य राज्यसभेवर निवडून गेला आहे. या विजयात माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची चाणक्यनीती यशस्वी ठरल्याचे बोलले जात आहे.



- **धनंजय महाडिक यांच्याकडून संजय पवार चीतपट**
- **विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची चाणक्यनीती यशस्वी**
- **राज्यभरात ठिकठिकाणी भाजपचा जल्लोष**

**पक्षनिहाय विजयी उमेदवार आणि त्यांना मिळालेली मते**

- पीयुष गोयल (भाजप) ४८
- अनिल बोंडे (भाजप) ४८
- धनंजय महाडिक (भाजप) ४१.५
- इम्रान प्रतापगडी (काँग्रेस) ४४
- प्रफुल्ल पटेल (राष्ट्रवादी) ४३
- संजय राऊत (शिवसेना) ४१

राज्यसभा निवडणुकीसाठी शुक्रवारी मतदान झाले. मतदान झाल्यानंतर दोन्ही बाजूंकडून एकमेकांच्या काही आमदारांची मते बाद ठरवण्याची मागणी करण्यात आली होती. या संदर्भात मध्यरात्री निवडणूक आयोगाने निर्णय देत महाविकास आघाडीचे सुहास कांदे यांचे मत बाद ठरवले. त्यानंतर झालेल्या मतमोजणीत भाजपने तीन जागा जिंकत बाजी मारली. (पान २ वर..)

**भाजप तिसरी जागा जिंकणारच होता. त्यामुळे अर्ज मागे घेण्याच्या दिवशी आम्ही त्यांच्याकडे आग्रह धरला की, हट्ट करू नका. गेल्या २४ वर्षांत महाराष्ट्रात राज्यसभेच्या निवडणुका झाल्या नाहीत, पण त्यांना फटके खाल्ल्याशिवाय शहाणपण शिकता येत नसेल तर त्यांना तसेही फटके मिळतील.**

**–चंद्रकांत पाटील**, भाजप प्रदेशाध्यक्ष

**शिवसेनेने लढवलेल्या सहाव्या जागेसाठी मतांची संख्या कमी होती, पण धाडस करीत प्रयत्न केला. अपक्ष आमदारांना आपल्या बाजूने घेण्यात भाजप यशस्वी ठरला. मान्य केले पाहिजे की, देवेंद्र फडणवीस यांना विविध मार्गांनी माणसे आपलीशी करण्यात यश आले आहे.**

**–खासदार शरद पवार**, राष्ट्रवादीचे अध्यक्ष

## ही तर सुरुवात, पुढील लोकसभा-विधानसभाही स्वबळावर जिंकू! : विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस

### भाजपचा विजयोत्सव; मान्यवरांच्या हस्ते विजयी उमेदवारांचा सत्कार



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाला राज्यसभा निवडणुकीत मिळालेला विजय ही सुरुवात असून यापुढे पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, निवडणुकीत तसेच २०२४च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतही भाजप स्वबळावर दणदणीत विजय मिळवेल, असा विश्वास माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. ११) व्यक्त केला. ते मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयातील विजयोत्सवावेळी बोलत होते.

प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात भाजपचे विजयी उमेदवार केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, भाजप किसान मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. अनिल बोंडे आणि प्रदेश प्रवक्ते धनंजय महाडिक यांचा सत्कार पक्षाचे निवडणूक प्रभारी व केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, मुंबई भाजप अध्यक्ष मंगलप्रभात लोढा उपस्थित होते. या वेळी भाजपचे प्रदेश पदाधिकारी, आमदार तसेच कार्यकर्त्यांच्या उत्साही गर्दीत जल्लोष करण्यात आला. ढोल–ताशांचा गजर आणि कार्यकर्त्यांच्या घोषणांमध्ये फुलांची उधळण करून विजयाचा आनंद साजरा करण्यात आला.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोल्हापूरचे पैलवान धनंजय महाडिक यांनी शिवसेनेला छोबीपछाड दिला. त्यांचे अभिनंदन! मी काल बोललो होतो की आपला विजय लढवय्ये आमदार लक्ष्मण जगताप, मुक्ता टिळक यांना समर्पित आहेत. काहीही झाले तरी मतदान करणार या भावनेने ते आले. त्यांच्यामुळे आपली तिसरी जागा निवडून आली. (पान २ वर..)

## निवडक

### केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात पाच टक्क्यांनी वाढ होणार आहे. ही वाढ १ जुलैपासून लागू होणार असल्याची माहिती आहे. या निर्णयामुळे केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात सुमारे ३४ हजार रुपयांपर्यंत वाढ होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### ख्यातनाम चित्रकार रवी परांजपे यांचे निधन



**पुणे** : ख्यातनाम चित्रकार रवी परांजपे यांचे शनिवारी (दि. ११) अल्प आजाराने पुण्यातील खासगी रुग्णालयात निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. भारतीय चित्रकला शैलीतील चित्रकार म्हणून त्यांची ओळख होती. वास्तुशिल्पशास्त्र, प्रकाशन, जाहिरात या क्षेत्रात त्यांनी काम केले. त्यांना विविध राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

## रोह्यातील डोलवहाळ धरणात बुडून पर्यटकाचा मृत्यू





**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कोलाडनजीक पुई येथील डोलवहाळ धरणात पोहण्यासाठी गेलेल्या २१ वर्षीय पर्यटकाचा शुक्रवारी (दि. १०) बुडून मृत्यू झाला.

कोलाड पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मोहम्मद असिफ अब्दुल रहमान खान (वय २१, रा. तळेगाव, जि. पुणे) हा शुक्रवारी त्याची मावशी मोमीन खातून, मावस भाऊ एयाज खान व अय्यज खान, मावस बहीण बुशरा हाफीजूर रहमान खान (रा. धारावी, मुंबई) यांच्यासह डोलवहाळ धरण परिसरात पर्यटनासाठी आले होते. त्या वेळी असिफ अब्दुल रहमान खान धरणाखालील नदीच्या पाण्यात पोहत असताना त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.


घटनेचे वृत्त समजताच कोलाड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने पाण्यात शोध घेऊन बुडालेल्या तरुणास पाण्याबाहेर काढून दवाखान्यात नेले. तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## पहिल्याच पावसात बत्ती झाली गुल!

**मुरूड : प्रतिनिधी**

मान्सूनचे आगमन झाले आणि पहिल्या पावसात महावितरणने वीज गायब केली. मुरूडमध्ये तब्बल १४ तास वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचे हाल झाले.

**मुरूडमध्ये १४ तास वीज गायब; नागरिकांचे हाल**



मुरूडमध्ये शुक्रवारी (दि. १०) रात्री तुरळक पाऊस पडला. पावसाचे प्रमाण कमी असले तरी महावितरणने बत्ती गुल केली. रात्री ९ वाजता वीज गायब झाली ती दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता आली. त्यामुळे लोकांना रात्र काळोखात काढावी लागली तसेच अनेकांना झोपसुद्धा मिळाली नाही. तुरळक पाऊस पडताच जर महावितरण वीज घालवत असेल, तर मग मुसळधार पाऊस पडल्यास काय होणार, असा सवाल लोक विचारत आहेत.

दरम्यान, याबाबत मुरूड महावितरणचे उपकार्यकारी अभियंता महादेव दातीर यांनी मुख्य विद्युतवाहिनीवर झाड पडल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला होता. कर्मचाऱ्यांनी तो सुरळीत केला आहे, असे सांगितले, मात्र १४ तास वीज नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

## नेरूळमध्ये स्लॅब कोसळून सात जण जखमी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर १७मधील जिम्मी टॉवर इमारतीत स्लॅब कोसळून सात जण जखमी झाल्याची दुर्घटना शनिवारी (दि. ११) घडली. जखमींवर उपचार सुरू आहेत.



जिम्मी टॉवर या आठ मजली इमारतीच्या सहाव्या मजल्यावरील ६०१ क्रमांकाच्या फ्लॅटच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. काम सुरू असलेल्या फ्लॅटचा स्लॅब दुरुस्तीवेळी शनिवारी दुपारी पावणे एक वाजता अचानक कोसळला. या वेळी सहाव्या मजल्यापासून तळापर्यंत स्लॅब कोसळत गेल्याने या दुर्घटनेत सात जण जखमी झाले. यामध्ये निशा धर्माणी (वय ४८), रिया धर्माणी (२), सोनाली गोडबोले (२९), आदित्यराज गोडबोले (१५), सौमित्र गोडबोले (५०), ललिता त्यागराजन (८०), सुब्रमण्यम त्यागराजन (८४) यांचा समावेश आहे. यातील चार किरकोळ जखमी असून तीन गंभीर जखमींवर नेरूळमधील डी. वाय. पाटील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, या दुर्घटनेची माहिती मिळताच नवी मुंबई महापालिकेच्या अग्निशमन दलातील चार गाड्या, आपत्कालीन मदत पथक घटनास्थळी तातडीने येऊन त्यांनी बचावकार्य सुरू केले. त्याचप्रमाणे स्थानिक आमदार मंदाताई म्हात्रे, माजी आमदार संदीप नाईक, भाजप महामंत्री विजय घाटे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन येथील नागरिकांना मदतकार्यात सहकार्य केले.

## रायगड जिल्ह्यातील नगर परिषद आरक्षण, सोडत उद्या होणार जाहीर



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षित जागा निश्चित करण्यासाठी आरक्षण व सोडत येत्या सोमवारी (दि. १३) काढण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशातील निर्णयानुसार आरक्षण ठरविण्याचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये जिल्हा प्रशासनाने तसा कार्यक्रम जाहीर केला आहे.

या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगर परिषदांच्या आरक्षण व सोडतीवरील प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना स्वीकारण्यासाठी संबंधित नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आरक्षण सोडतीचे ठिकाण वेळ तसेच आरक्षण व सोडतीवरील हरकती स्वीकारण्याचे ठिकाण, वेळ निश्चित करण्यात आली आहे.

प्रत्येक नगर परिषदेत १३ जून रोजी सकाळी ११ वाजल्यापासून आरक्षण सोडत तसेच आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत. आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सूचना १५ ते २१ जूनपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी कळविले आहे.

## भाजपच्या विजयाचा पनवेलमध्ये आनंदोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून भारतीय जनता पक्षाचे तीनही उमेदवार निवडून आले आहेत. याबद्दल भाजपच्या पनवेल शहर व तालुका मध्यवर्ती कार्यालयापाशी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि. ११) पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष केला.



राज्यसभेच्या सहा जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपचे पीयुष गोयल, डॉ. अनिल बोंडे आणि धनंजय महाडिक यांचा विजय झाला आहे. या निवडणुकीत माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी अचूक व्युहरचना करून विरोधकांना पाणी पाजले. याबद्दल पनवेलमध्ये भाजपकडून फटाके वाजवून, पेढे वाटून तसेच बॅण्डच्या तालावर नृत्य करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस अमरीश मोकल, भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सहसंयोजक तथा कोकण प्रभारी गोविंद गुंजाळ, कोकण सहसंयोजक भास्कर यमघर, महिला सहसंयोजक उज्ज्वला गलंडे, उत्तर रायगड जिल्हा संयोजक बबन बारगजे, महिला जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष शैलेत काते, किसन पाटील, संजय जैन, प्रसाद हनुमंते, अनंत गुरव, हारू भगत, राजू कोळी, शांताराम कोळी, मधुकर उरणकर, गोपीनाथ लोखंडे, गुलाब बागवान, रोहित आटवणे, चांगा भोईर, गणेश म्हात्रे, रघुनाथ बहिरा, विजय म्हात्रे, सुहासिनी केकाणे, केदार भगत, चेतन कांबळे, सुबोध ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## राज्यातील काही भागांमध्ये पावसाचा यलो अलर्ट जारी

- **मुसळधार पर्जन्यवृष्टीची शक्यता**

**पुणे : प्रतिनिधी**

मान्सूनचे अखेर आगमन झाले असून उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांसह बळीराजाला दिलासा मिळाला आहे. त्यानंतर आता हवामान विभागाने राज्यातील काही भागांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. म्हणजेच पुढील दोन दिवस या ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

गेल्या आठवड्यात मान्सूनचा वेग अचानक मंदावला होता. त्यामुळे मान्सूनचे आगमन उशिरा होण्याची भीती निर्माण झाली होती, पण आता मान्सूनने योग्य वेग घेतला असून येत्या दोन–तीन दिवसांत मान्सून महाराष्ट्र व्यापेल. असे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील अनेक भागांत पावसाचा अंदाज आहे .

हवामान खात्याने कोकण विभागातील पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्रातील नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, धुळे येथे यलो अलर्ट जारी केला आहे. याशिवाय मराठवाड्यातील जालना, बीड, परभणी, औरंगाबाद, नांदेड आणि विदर्भातील बुलढाणा, वाशीम, अमरावती, यवतमाळ, अकोला, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली या भागांसाठीही यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांतील नागरिकांना पावसाचा अंदाज घेऊनच घराबाहेर पडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेला जागा दाखवली

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे प्रतिपादन



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांच्या अभ्यासू व कल्पक नेतृत्वामुळे भाजपला मोठा विजय मिळाला असून देवेंद्र फडणवीस यांनी राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेला आपले जागा दाखविली आहे, अशी प्रतिक्रिया रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात राज्यसभा निवडणुकीत भाजपच्या तीन जागा जिंकून आणल्याबद्दल माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचे रामदास आठवले यांनी अभिनंदन केले आहे. भाजपचे राज्यसभा उमेदवार केंद्रीयमंत्री पियुष गोयल, अनिल बाँडे, धनंजय महाडिक या विजयी उमेदवारांचे रामदास आठवले यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

**काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या तीन पक्षांच्या महाविकास आघाडीला भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी धोबीपछाड देत कौशल्याने भाजपची तिसरी जागा जिंकून आणली आहे, या निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेला आपली जागा दाखविली आहे, निवडणूक कशी जिंकायची ती शिकविली आहे, तिसरी जागा जिंकून बड्या बड्या वाघांची मान झुकविली आहे, अशी कविता सादर करून रामदास आठवले यांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे.**

## माणगाव पाणोसेतून बाप-लेकीचे अपहरण

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाणोसे आदिवासीवाडी येथून वडील व मुलीला फूस लावून पळविल्याने अज्ञात इसमावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी (दि. ८) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबतची फिर्याद भिका रोहिदास कोळी (वय ३०) रा. पाणोसे आदिवासीवाडी यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

माणगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी भिका रोहिदास कोळी यांचे पती रोहिदास गणपत कोळी (वय ३२) व मुलगी रोहिणी रोहिदास कोळी (वय ७) यांना कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळून नेले आहे. याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार मगर हे करीत आहेत.

# ठाकरेंच्या माफिया सरकारची उलटी गिनती झाली सुरू

## भाजप नेते किरीट सोमय्या यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार संजय पवार यांचा पराभव करीत भाजप उमेदवार धनंजय महाडिक यांनी विजय मिळवला. महाडिक यांच्या विजयानंतर भाजप गटात जल्लोषाचे वातावरण आहे. या विजयानंतर भाजप नेते किरीट सोमय्या यांनी शिवसेनेवर निशाणा साधला आहे.



ठाकरे यांच्या माफिया सरकारची उलटी गिनती सुरू, असे ट्विट सोमय्या यांनी केले आहे. राज्यसभा निवडणुकीचा निकाल लागण्याअगोदर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आमचे चारही उमेदवार विजयी होतील, असा दावा केला होता, मात्र निकालानंतर त्यांचा हा दावा फोल ठरला. सहाव्या जागेसाठी शिवसेनेचे संजय पवार यांना प्रबळ उमेदवार मानले जात होते. महाविकास आघाडीकडे पुरेसे संख्याबळ असतानाही भाजपाने सहाव्या जागेवर आपला उमेदवार धनंजय महाडिक यांना राज्यसभेवर निवडून आणले. धनंजय महाडिक यांच्या विजयानंतर भाजपाने शिवसेनेला डिवचायला सुरुवात केली आहे. आमच्या तिसऱ्या उमेदवाराला संजय राऊतांपेक्षाही जास्त मते मिळाली असा टोला त्यांनी शिवसेनेला लगावला आहे.

उद्धव ठाकरे यांनी दाऊदच्या एजंटला मंत्रिमंडळात ठेवले, आता त्यांना धडा महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनता शिकवणार, असा इशाराही सोमय्या यांनी दिला आहे.

## भाजप नेते कृष्णा कोबनाक यांच्या प्रयत्नाने

# म्हसळ्यातील दोन रस्त्यांना मिळणार जिल्हा दर्जा







(छाया : संजय खांबेटे)

**म्हसळा : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील भाजपचे नेते कृष्णा कोबनाक यांच्या पाठपुराव्याने म्हसळा तालुक्यातील चिरगाव-ताम्हणे करंबे-भापट-कोलवट रस्ता आणि दांडगुरी-धनगर मलई-नागलोली-वरवठणे रस्ता हे दोन्ही रस्ते सध्या इतर जिल्हामार्ग आहेत. त्यांची दर्जोन्नती होऊन प्रमुख जिल्हामार्ग व्हावे, असा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांनी अधीक्षक अभियंता नवी मुंबई यांचेकडे पाठविला आहे.

याबाबतची मागणी श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील भाजपचे नेते कृष्णा कोबनाक यांनी लावून धरली होती. चिरगांव-ताम्हणे करंबे-भापट-कोलवट या रस्त्याचा दर्जा उत्तम झाल्यास सुमारे चार गावांतील लोकसंख्येला फायदा होणार आहे, तर दांडगुरी-धनगर मलई-नागलोली-वरवठणे या रस्त्यामुळे या भागातील सुमारे १८०० ते २००० लोकसंख्येला फायदा होणार आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ याला आणि ईजिमा ५७ आणि राज्यमार्ग ९८ला जोडणारा आसल्यामुळे या भागातील छोटी-मोठी गावे दळण-वळणाच्या दृष्टीकोनांतून म्हसळा शहराला जोडली जातील.

दर्जोन्नती होणारे हे दोन्ही रस्ते प्रत्येकी सुमारे ८ किमी. लांबीचे आहेत. अनुषंगाने या भागातील पर्यटन आणि आर्थिक विकास होईल. कृष्णा कोबनाक यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे हे दोन्ही रस्ते बांधकाम विभागाने प्रस्तावित केले आहेत. तालुक्यातील पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून तोंडसुरे ते साळविंडे रस्ते होण्यासाठी कोबनाक यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

**दांडगुरी-धनगर मलई-नागलोली-वरवठणे या रस्त्याला भविष्यात दर्जोन्नती मिळाली तर पर्यटक या रस्त्यावरील पेडांबे जवळील वाघेश्वर (श्री शिवमंदिर), नागलोली जवळील देवखोल येथील श्री क्षेत्र कुसुमेश्वर देवस्थान या प्राचीन मंदिरांना भेट देतील, पर्यायाने या भागाचे धार्मिक महत्त्व वाढेल.**

**-शुभदा कर्वे, श्री कुसुमेश्वर देवस्थान, डोंबिवली**

# संत तुकाराम महाराज शिळा मंदिर लोकार्पणासाठी देहूत जय्यत तयारी

**पुणे : प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र देहूत जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या शिळा मंदिराचे लोकार्पण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या मंगळवारी (दि. १४)देहूत येणार आहेत. त्या निमित्ताने मंदिरात आणि देहू परिसरात जय्यत तयारी सुरू आहे. २० जूनला तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून त्यापूर्वी पंतप्रधान देहूत येणार असल्याने वारकरी संप्रदायात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



देहूतील मुख्य मंदिरामध्ये दगडात कोरीव काम करून साकारण्यात आलेल्या या शिळामंदिराची पायाभरणी प्रतिभा पाटील राष्ट्रपती असताना झाली होती. त्याचे लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते व्हावे, असा संस्थानचा आग्रह होता. त्या दृष्टीने २९ मार्च रोजी पंतप्रधानांना निमंत्रण देण्यासाठी संस्थानचे विश्वस्त मंडळ दिल्लीत गेले होते. त्यानुसार या कार्यक्रमासाठी १४ जूनची तारीख निश्चित करण्यात आली होती.

कार्यक्रमाचा दिवस जवळ आल्याने देहूत देवस्थानकडून त्याची मोठ्या जोमाने तयारी सुरू आहे. मुख्य मंदिरातील काही कामे पूर्ण करण्यात येत असून, त्याची सजावटही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठा सभामंडपही उभारण्यात आला आहे. पोलिसांसह जिल्हा प्रशासनही या कार्यक्रमासाठी सज्ज झाले आहे.

# बँकांनी खरिपाचे उद्दिष्ट ३१ जुलैपूर्वी पूर्ण करावे

## रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या सूचना

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये बँकांना ठरवून दिल्याप्रमाणे सरकारी, खासगी, सहकारी बँकांनी खरिपाचे १०० टक्के उद्दिष्ट ३१ जुलैपूर्वी पूर्ण करावे, असे आदेश रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिले आहेत.

बँकांनी ३१ जुलैपर्यंत प्रत्येक शाखेने किसान क्रेडिट कार्ड वाटप करण्यासाठी किमान चार शिबिरांचे आयोजन करावे. त्याचबरोबर प्रत्येक शिबिरामध्ये ५० नवीन शेतकरी (प्रधानमंत्री किसान सन्मान योजना) लाभार्थी किसान क्रेडिट कार्डचा लाभ घेतील, असे नियोजन करावे. विद्यमान किसान क्रेडिट कार्डधारक कर्जदारांना घेतलेल्या कर्जाचे वेळेत परतफेड करून नवीन पीककर्ज घेण्यास प्रोत्साहित करावे, असे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सूचित केले आहे.

जिल्ह्याचा मागील पाच वर्षांचा आढावा घेतला असता साधारणपणे ९० टक्के पीककर्ज वाटप झाले आहे, परंतु आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये एकूण उद्दिष्ट रु. ३१० कोटी असताना रु. २४८ कोटी (७४ टक्के) इतके उद्दिष्ट साध्य झाले आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता एकूण खरीप कर्ज वाटपाचे उद्दिष्ट रु. २७२ कोटी इतके ठेवण्यात आले असून ३१ मेपर्यंत जिल्ह्यातील बँकांनी रु. ७२ कोटी १४ लाख (२७ टक्के) इतके उद्दिष्ट साध्य केले आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये असेच सक्रिय काम करून प्रत्येक बँकांनी खरिपाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करून जिल्ह्याच्या विकासामध्ये आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

## ज्येष्ठ नागरिकाला पावणेदहा लाखांचा गंडा

**पुणे : प्रतिनिधी**

महावितरणचे अधिकारी असल्याची बतावणी करून चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाला एक ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्यातून नऊ लाख ७९ हजार रुपये लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याबाबत एका ७५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार मीरानगर परिसरात राहायला आहेत. दोन दिवसांपूर्वी चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइलवर वीज बिल भरण्याबाबतचा संदेश पाठविला. त्यानंतर महावितरणधील अधिकारी आयुष कुमार बोलत असून वीज बिल भरण्यासाठी एक ॲप डाउनलोड करावे लागेल, अशी बतावणी चोरट्याने त्यांच्याकडे केली. हे ॲप डाउनलोड केल्यानंतर ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती चोरट्यांकडे गेले. या माहितीचा गैरवापर करून चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्यातून दोन वेळा एकूण मिळून नऊ लाख ७९ हजार रुपये रक्कम लांबविली.

# गेल्या आठ वर्षांत समृद्ध भारताची निर्मिती

## केंद्रीय उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे प्रतिपादन



**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय पातळीवर नवीन ओळख निर्माण करण्यासाठी मोदी सरकारने अनेक आव्हानांचा यशस्वीपणे सामना केला. त्याचबरोबर या आठ वर्षांत अनेक योजनांच्या माध्यमातून गोरगरिबांच्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त केला. मोदी सरकारच्या आठ वर्षांच्या काळात आधुनिक, सामर्थ्यशाली, समृद्ध नवभारताची पायाभरणी झाली, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी शनिवारी केले.

भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भाजप मुंबई अध्यक्ष आमदार मंगलप्रभात लोढा, प्रदेश सरचिटणीस आमदार चंद्रशेखर बावनकुळे, खासदार मनोज कोटक, मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय आदी या वेळी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले की, आठ वर्षापूर्वी देशात भ्रष्टाचाराचे साम्राज्य तयार झाले होते. लोककल्याणाच्या योजनांना भ्रष्टाचाराचे ग्रहण लागले होते. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार मे २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर हे चित्र बदलू लागले. एकात्म मानववाद, अंत्योदयचा विचार सत्तेचा आत्मा आहे, हे ध्यानात ठेवून मोदी सरकारने सामान्य माणसासाठी अनेक लोककल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे गोरगरिबांपर्यंत सरकारी योजनांचे लाभ पोहचू शकले. या लोककल्याणकारी योजनांमुळेच देशाच्या विकासाला गती मिळाली. यातूनच नवा भारत उदयास येत आहे. कोरोना काळात मोदी सरकारने आव्हानांचे रूपांतर संधीमध्ये केले. भारताला पोलिओ व इतर अनेक संसर्गजन्य आजारांची लस आयात करावी लागली आहे. याच भारताने कोरोना काळामध्ये दोन लसींची निर्मिती करून संपूर्ण जगभरात त्याचा पुरवठा केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या नेतृत्वामुळे हे शक्य झाले असेही ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, पायाभूत सुविधांना गती देण्याच्या मोदी सरकारच्या धोरणामुळे देशभरात आठ वर्षांत ६६ विमानतळ उभारले गेले. द्रुतगती व राष्ट्रीय महामार्गांचे जाळे देशभर उभारले जात आहे. जन- धन योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शौचालय बांधणे, उज्ज्वला योजनेतून गोरगरिबांच्या विकासाचा मार्ग मोकळा केला. किसान सन्माननिधी, पीक विमा योजनेतून शेतकऱ्यांचा विकास साधला. मुद्रा, स्टार्ट अप इंडिया, आत्मनिर्भर भारत या योजनांतून औद्योगिक विकासाची गती वाढत आहे.

पान १ वरून

## महाविकास आघाडीला जबर धक्का

शिवसेनेकडून संजय राऊत आणि संजय पवार या दोघांचा विजय होईल असा दावा केला जात होता, मात्र मतमोजणीत पवार यांना फक्त ३८ मते पडली, तर धनंजय महाडिकांना ४१ मते मिळून ते विजयी झाले. शिवसेनेसाठी हा पराभव धक्कादायक मानला जात आहे.

दरम्यान, भाजपच्या विजयानंतर राज्यभरात ठिकठिकाणी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून, पेढे वाटून आणि फटाके वाजवून जल्लोष केला. तीन पक्षांविरुद्धची लढाई जिंकल्याने जोरदार आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

## ही तर सुरुवात : विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस

राज्यसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीच्या तोंडचे पाणी पळाले आहे. पराभवाने आघाडीचे नेते पिसाटले आहेत, असे सांगून देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यसभेत आपले तिन्ही उमेदवार निवडून आले ही चांगली गोष्ट आहे, मात्र हा छोटा विजय आहे. मोठी लढाई अजून बाकी आहे. आपल्याला येणाऱ्या निवडणुका जिंकायच्या आहेत. सगळीकडे या सरकारला दणके देऊ. २०२४मध्ये केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार असेल यावर मला विश्वास आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी उत्साह कायम ठेवावा. आता सुरुवात झाली आहे. राज्यात आणि मुंबई पालिकेवर भाजपचा भगवा फडकवायचाय हे लक्षात ठेवा.

महाविकास आघाडी सरकारमुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे. विकास थांबला आहे. राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था वाईट आहे, प्रकल्प बंद आहेत, विजेचा तुटवडा आहे, जीएसटीचे पैसे मिळाले तरी पेट्रोल- डिझेलवरील कर कमी करण्यास राज्य सरकार तयार नाही. महाविकास आघाडी सरकार आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

नागरिकांनी भाजप आणि शिवसेनेच्या सरकारला मतदान केले होते, मात्र शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसला सोबत घेऊन बेईमानीने सरकार स्थापन केले. आता सरकार किमान चालवून तरी दाखवा, असा टोलाही फडणवीस यांनी लगावला.

प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील म्हणाले की, महाविकास आघाडीने कठोर भूमिका घेतल्यामुळे राज्यसभा निवडणुकीसाठी मतदान करावे लागले. देवेंद्र फडणवीस यांनी अचूक रणनीती बनवून भाजपच्या तिन्ही उमेदवारांना विजयी केले. शिवसेना नेते संजय राऊत यांच्यापेक्षा भाजपच्या उमेदवाराला अधिक मते मिळाली. या निवडणुकीतील यशानंतर चित्र बदलेल. विधान परिषद निवडणुकीतही भाजपला चांगले यश मिळेल.

# फणस महागले, कमी उत्पन्नाचा फटका

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वटपौर्णिमेला फणसांच्या गऱ्यांना महिलावर्गाची खास मागणी असते, परंतु यावर्षी बाजारात फणसांच्या किमती गगनाला भिडल्या असल्याने नाराजीचा सूर आहे.

या वर्षी फणसाचे उत्पन्न फारच कमी आले असल्याचे बागायतदारांचे म्हणणे आहे. त्यामुळे नेहमीपेक्षा बाजारात विक्रीसाठी फणस फारच कमी प्रमाणात उपलब्ध असल्याची तक्रार विक्रेता करतायेत. त्यामुळे वटपौर्णिमेला फणसाची मोठी मागणी लक्षात घेता, फणसाची उपलब्धता कमी असल्याने आपोआप फणसाचे दर वाढले आहेत. १०० ते २०० रुपये किमतीचे फणस सध्या बाजारात ३०० ते ५०० रुपयांना उपलब्ध आहेत. वटपौर्णिमेला महिलावर्गाची फणसाच्या गरांसाठी खुपच मागणी असते, परंतु फणसाचे वाढलेले बाजारभाव न परडवणारे असल्याने यावर्षी महिलावर्ग फणसांच्या खरेदीला बाजूला ठेवेल, असेच चित्र दिसते.

गेल्या दोन वर्षांत चक्रीवादळ व अतिवृष्टीने बागायतदारांचे खूपच नुकसान झाले, यामुळे फणसाचे नेहमीचे उत्पन्नाचे प्रमाण प्रतिवर्षापेक्षा फारच कमी आहे. बागायतदारांना मोठ्या आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागले आहे.



(छाया : महेंद्र खैरे)

# गवळीदेव पर्यटनस्थळाचा लवकरच होणार विकास

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील नैसर्गिक पर्यटनस्थळ असलेल्या गवळीदेव पर्यटनस्थळाचा लवकरच विकास करण्यात येणार आहे. नवी मुंबई व मुंबईकरांचे आकर्षण असलेल्या गवळीदेव धबधबा व परिसराचा कायापालट होणार आहे. यासाठीचा नवी मुंबई महापालिकेचा प्रस्ताव तयार असून प्रशासकीय मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.

ऐरोली मतदारसंघाचे माजी आमदार संदीप नाईक, आमदार गणेश नाईक व खासदार राजन विचारे मागील अनेक वर्षांपासून गवळीदेव धबधबा व परिसराला वेगळे रूप प्राप्त होण्यासाठी पालिका व महाराष्ट्र पर्यटन व पर्यावरण विभागाकडे पाठपुरावा करीत होते, परंतु निधीअभावी व वनविभागाकडे आराखडा तयार नसल्यामुळे विकास रखडला होता. आता गवळीदेव स्थळाचा विकास होणार असल्यामुळे नवी मुंबई शहराचा नावलौकिकात भर पडेल.

महापालिका आयुक्त बांगर, शहर अभियंता, वन संरक्षक अधिकाऱ्यांसमवेत पाहणी दौरा केला होता. वनविभागाकडे निधी नसल्याने नवी मुंबई महापालिकेने या पर्यटन स्थळांसाठी वनविभागाला २०१४ मध्ये एक कोटीचा निधी दिला होता, मात्र काही तांत्रिक कारणामुळे पर्यटन स्थळाच्या विकासकामाला सुरुवात झाली नव्हती. मफतलाल समुहाच्या नोसिल कंपनीने हा डोंगर भाडेपट्ट्याने घेऊन विकसित केला असून त्या ठिकाणी पाच लाख झाडांचे संवर्धन केले होते, परंतु नोसिल कंपनी बंद पडल्यानंतर डोंगराची वाताहत झाली.

नवी मुंबई कार्यक्षेत्रातील या डोंगराचा विकास करायचा असेल तर वनविभागाला निधी द्या, त्यानुसार वनविभाग खर्च करेल, असे वनविभागाने पालिकेला कळवले होते. डोंगरावर स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, डोंगर कडेकपारीचे संरक्षण, माथ्यावर जाण्यासाठी पायऱ्या, विहिरी, तलावाची स्वच्छता, पर्यटन विश्रांतीकक्ष, बसण्याची व्यवस्था, पक्षी-प्राण्यांची माहिती फलक, पथदिवे, ठिकठिकाणी कचराकुंडी, डागडुजी करणे, काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सीसीटीव्ही इत्यादी सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# सिडको घेराव आंदोलन बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यात याव्या यासाठी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने 'दिबां'च्या स्मृतिदिनी म्हणजेच २४ जूनला सिडको घेराव आंदोलनाची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या होणाऱ्या बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. धाकटा खांदा, मोठा खांदा गाव, गव्हाण-कोपर, शेलघर, बेलपाडा येथे बैठका झाल्या.

या बैठकांमध्ये सर्वपक्षीय कृती समितीचे सहचिटणीस राजेश गायकर यांनी मार्गदर्शन करून सिडको घेराव आंदोलन यशस्वी करण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, जयवंत देशमुख, ग्रामपंचायत सदस्य कामिनी कोळी, उषा देशमुख, सुजाता पाटील, हेमंत ठाकूर, अनंत ठाकूर, सुधीर ठाकूर कमलाकर देशमुख, रघुनाथ देशमुख, दामोदर भोईर, भाऊ भोईर, पी. के. ठाकूर, अमित कडू, मधुकर म्हात्रे, राजेंद्र देशमुख, दयानंद घरत, मधुकर पाटील, आशिष घरत, राजेश पाटील, ज्येष्ठ नगरसेवक माजी सभापती मनोहर म्हात्रे, महेंद्र कावळे, सतीश पाटील, भाजप युवा नेते निलेश खारकर, अरुण नाईक, मदन पाटील, वितेश म्हात्रे, मच्छींद्र कोळी, प्रवीण ठाकूर, अश्विन नाईक, नंदू ठाकूर यांच्यास गावातील प्रमुख व्यक्ती उपस्थित होते.



## बेकायदेशीर होर्डिंग्जवर पनवेल महापालिकेची कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

नावडे-तळोजा गाव ते पेंधर फाट्यादरम्यान एकच फलक उभारण्यासाठी महापालिकेच्या वतीने परवानगी देण्यात आली असताना त्याठिकाणी अवाढव्य दोन फलक उभारण्यात येत होते. महापालिकेच्या अतिक्रमण विभागासोबतच परवाना विभागाला याबाबत माहिती मिळताच पनवेल महापालिकेच्या वतीने बेकायदेशीर होर्डिंग्जवर कारवाई करण्यात आली.



नावडे-तळोजा रोडच्या बाजूला शालिमार हॉटेलजवळ महामार्गालगत खासगी कंपन्यांच्या माध्यमातून जाहिरात फलक लावण्यासाठी लोखंडी सांगाडे उभारण्याचे काम सुरू होते. लोखंडी फलक उभारण्यासाठी व जाहिरात प्रकाशित करण्यासाठी पालिकेच्या परवानगीची आवश्यकता असते, मात्र येथील एकाच जाहिरात फलकाला पालिकेची परवानगी देण्यात आली होती. दोन विनापरवानगी होर्डिंगचे काम चालू असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली होती.

या तक्रारीनुसार एका होर्डिंगला परवानगी आहे व दोन होर्डिंग अनधिकृत होते. कटर मशीन आणि हायड्रामशीनच्या साह्याने अतिक्रमण विभागामार्फत ते तोडण्यात आले. या कारवाईदरम्यान उपायुक्त कैलास गावडे, प्रभाग अधिकरी जितेंद्र मढवी, अरविंद पाटील, कर्मचारी उपस्थित होते.

## सभापती प्रमिला पाटील यांच्याकडून मान्सूनपूर्व नालेसफाईची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेने सिडको वसाहतींमधील मान्सूनपूर्व कामे हाती असून ही कामे वेगाने सुरू आहेत. त्या पार्श्वभुमीवर कळंबोली शहरामध्ये सुरू असललेल्या नालसफाई तसेच गटारांच्या कामांची पाहणी प्रभाग समिती 'ब'च्या सभापती प्रमिला पाटील यांनी शुक्रवारी (दि. १०) केली तसेच अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.





पनवेल महापलिका क्षेत्रातील सिडको वसाहतीमधील मान्सूनपूर्व कामे महापालिका करणार आहेत. त्या पार्श्वभुमीवर महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी ही कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. त्याअंतर्गत कळंबोली परिसरामध्ये २००५ निर्माण झालेली पुरस्थिती पुन्हा उद्भवू नये तसेच पावसाळ्यात नागरिकांना कोणतीही समस्या हाोऊ नये याकरीता प्रभाग समिती ब मधील कामांची पाहणी सभापती प्रमिला पाटील यांनी अधिकाऱ्यांसह केली.

या दरम्यान त्यांनी होल्डिंग पॉईंट्स मोठे असलेले नाले, पंप हाऊस आणि नालेसफाईच्या कामांची या पाहणी केली. या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रवीनाथ पाटील, पनवेल महापालिकेचे नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, सरचिटणीस दिलीप बिस्ट, स्वच्छता निरीक्षक अरुण कांबळे, राहुल जाधव, किरण घाडगे, हर्षद निकुंभ आदी उपस्थित होते.

### निवडक

#### कुंडेवहाळमधून तरुण बेपत्ता

**पनवेल :** कोणास काही एक न सांगता वास्तव्याच्या ठिकाणाहून एक तरुण कोठे तरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शिबा हेटा बोरो (वय २६, रा. कुंडेवहाळ) असे हरवलेल्या तरुणाचे नाव असून त्याची उंची ५.५ फूट, रंग गोरा, केस काळे साधारण, चेहरा गोल, डोळे लहान, दाढी मिशी बारीक, नाक सरळ, उजव्या हाताच्या मनगटावर एस हे इंग्रजी अक्षर गोंधळले आहे. तो अंगाने सडपातळ असून अंगात काळी बनियन व काळी हाफ पॅन्ट घातली आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोहवा एस.एम. थोरात यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



#### तलावात आढळला मृतदेह

**पनवेल :** तालुक्यातील नेवाळी-आदई परिसरातील एका तलावात एका तरुणाचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाइकांचा शोध खांदेश्वर पोलीस करत आहेत. मयत तरुणाचे अंदाजे वय २० ते २२ वर्षीय असून हा तरुण नदीत बुडाला की, अन्य कारणांमुळे त्याचा मृत्यू झाला त्याचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत.

## खारघरमध्ये सोनेरी रंगाच्या कोल्ह्याचे झाले दर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**


सिडकोने खारघरमध्ये सेन्ट्रल पार्क भाग दोनसाठी राखीव भूखंड राखीव ठेवला आहे. येथील एका पाणथळ जागेवर सोनेरी रंगाच्या कोल्ह्याचे दर्शन झाले आहे. त्यामुळे नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत.

खारघरमध्ये सीबीडी सीमा रेषा ते ओवे डोंगर असा जवळपास सहा किलोमीटर परिसर डोंगराचा भाग आहे. सीबीडीपासून सुरू झालेली डोंगरांची रांग ही पार शिळफाट्याच्या पुढे मुंब्र्यापर्यंत जाते व पुढे पारसिक टेकडीला जाऊन मिळते. खारघर डोंगरावर पन्नास ते साठ वर्षांपूर्वी घनदाट जंगल असल्यामुळे कोल्हा, लांडगा, तरस, बिबट्या, वाघ आदी प्राणी वास्तव्य करीत असत. डोंगरावरील फणसवाडी, चाफेवाडी पाड्यातील ग्रामस्थांच्या शेळ्यांची रात्रीच्या वेळी वाघांनी शिकार केल्याचे ग्रामस्थ सांगतात.

दरम्यान, सिडकोकडून विकासाचे काम हाती घेतल्यावर परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या. जंगलाचे प्रमाण घटत गेले आणि हिरवे डोंगर भकास झाले. त्यामुळे हळूहळू जंगली प्राण्यांचे प्रमाण खूप कमी झाले. गुरुवारी (दि. ९) मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या एका पर्यावरणप्रेमी खारघर सेन्ट्रल पार्कसाठी राखीव असलेल्या भूखंडावरील एका पाणथळ जागी सोनेरी रंगाच्या कोल्ह्याचे दर्शन झाले.

### कांदळवनात वास्तव्याचा अंदाज

***सहा महिन्यांपूर्वी खारघर से. १७ येथील खाडीकिनारी खारफुटीच्या जंगलात पक्ष्यांचा अभ्यास करण्यासाठी पक्षीतज्ज्ञ, पक्षिप्रेमींनी भेट दिली होती. या वेळी पक्ष्यांचा फोटो काढण्यासाठी गेलेल्या ए. के. नूल या छायाचित्रकाराला खाडीकिनारी कोल्हा दिसताच त्यांनी त्याचा फोटो कॅमेऱ्यात कैद केला होता. खाडीतील मासळी, किनाऱ्यावर येणारे पक्षी आदी खाद्य मिळविण्यासाठी कोल्हा परिसरातील कांदळवनात राहत असावा, असे मुर्बी ग्रामस्थांनी सांगितले.***





**खारघर : सेक्टर ४ बेलपाडा येथील कै. मा. दि. बा. पाटील साहेब ज्येष्ठ नागरिक उद्यानामध्ये शुक्रवारी झालेल्या पावसात झाडे पडली आहेत. ही झाडे उचलण्यात यावी, अशी मागणी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी पनवेल महापालिकेच्या संबंधित विभागाकडे केली आहे.**

## वटपौर्णिमेपूर्वी बाजारात फसणाला मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वटपौर्णिमा जवळ आल्याने दरवर्षीप्रमाणे फणसाला मागणी वाढली आहे. यामुळे तळकोकणातून येणाऱ्या फणसाची विक्री करणाऱ्या गाड्या पनवेल परिसरातील विविध वसाहतींत दिसू लागल्या आहेत. फणस खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दरवर्षी पावसाळ्याच्या काही दिवस अगोदर बाजारात फणसाची मोठ्या प्रमाणात आवक होते. काही ठिकाणी किलोनुसार, तर काही ठिकाणी आकारानुसार विक्री होत आहे. मात्र या फणसाला इतर दिवसांपेक्षा वटपौर्णिमेला मागणी वाढत असल्याने कोकणातील शेतकऱ्यांकडून थेट ग्राहकांच्या दारात फणस विक्री करण्यासाठी आणले जात आहेत. वटपौर्णिमेला आता फक्त दोन दिवस उरले आहेत. फणस पिकण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागत असल्यामुळे फणस विकत घेऊन घरी नेण्याला ग्राहक पसंती देत असल्याची माहिती शुभम शिंदे या विक्रेत्याने दिली; तर मोठा फणस खरेदी करण्यापेक्षा रसाळ गरे खरेदीलादेखील ग्राहक पसंती देत आहेत. ग्राहकांच्या मागणीनुसार अनेक विक्रेते फणसातील गरे काढून त्याची विक्री करत आहेत.

**कापा फणसाला बाजारात जास्त मागणी आहे. मात्र कोकणातून बाजारात बरका फणस ९० टक्के, तर कापा फणसाची फक्त १० टक्के आवक होते.**

**-अमोल देशमुख, फणस विक्रेता**

**गऱ्यांची विक्री (किलोमध्ये)**

**कापा फणस ८० ते १०० रुपये**

**बरका फणस १०० ते १२० रुपये**





### ऑनलाइन विक्रीला प्रतिसाद

**बाजारात सध्या ऑनलाइन खरेदी-विक्रीचा ट्रेंड सुरू आहे. या ट्रेंडला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. नवी मुंबईत राहणाऱ्या मूळ कोकणातील नागरिक सध्या आकारानुसार ३०० ते ५०० रुपये दराने फणसाची ऑनलाइन विक्री करत आहेत. तसेच बाजारात कापा आणि बरका या प्रकारातील फणस विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यामध्ये कापा जातीच्या फणसाला जास्त मागणी असल्याने तो महाग आहे.**

## आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन

**पनवेल :** गेल्या दोन दिवसांपासून रायगडासह राज्यात पावसाची रिपरिप सुरू झाली आहे. पावसाळा म्हटले की आजारांना आमंत्रण त्यातच कोरोना रुग्णसंख्या पुन्हा वाढत असल्याने आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

पनवेलमध्ये कोरोना रुग्णसंख्या वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना मास्क लावण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. पावसाळ्यात कधी ढगाळ तर कधी अचानक उन्हाच्या झळा जाणत असल्याने अशा वातावरणाचा मानवाच्या शरीरावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. वातावरणातील हा बदल अनेक आजारांना आमंत्रण देत असून डॉक्टरांनी नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

## उलवे नोडमधील सोनाराला सव्वा लाखाचा गंडा




**पनवेल : वार्ताहर**

सोनाराला बनावट चेन विकून एक लाख २० हजार रुपयांचा गंडा घातल्याची घटना उलवे नोड मध्ये घडली आहे.

उलवे सेक्टर २० येथील सागर ज्वेलर्समध्ये हा प्रकार घडला आहे. कामगार अरुणकुमार जोशी हा ज्वेलर्समध्ये असताना एक अनोळखी व्यक्ती त्याठिकाणी आली होती. त्याने एका ओळखीच्या व्यक्तीचे नाव सांगून त्याच्याकडील सोन्याची चेन विकायची असल्याचे सांगितले. या वेळी शिफारस केलेले नाव परिचयाचे असल्याने जोशी याने त्या ग्राहकाकडील चेनचे मूल्य करून त्याला एक लाख २० हजार रुपये दिले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी तीच व्यक्ती पुन्हा सोन्याची चेन विक्रीसाठी दुकानात आली. यामुळे जोशी याला संशय आल्याने त्याच्याकडील चेन घेऊन तपासली असता ती बनावट असल्याचे उघड झाले.

याबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने ती चेन मित्राची असल्याचे सांगून चलाखीने तिथून पळ काढला. याप्रकरणी एनआरआय पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानुसार ग्राहक बनून आलेल्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

रविप्रहर
राम प्रहर
www.ramprahar.com

## शेजारी पाकिस्तान आणि श्रीलंकेत आर्थिक आणीबाणीची स्थिती

# शिस्तीमुळे भारताला आर्थिक स्थैर्याची फळे

**पाकिस्तान आणि श्रीलंका या दोन शेजारी देशांमध्ये आर्थिक आणीबाणी लागू करण्याची वेळ आली आहे. भारत मात्र अशा अस्थिर कालखंडात आर्थिक स्थैर्य अनुभवतो आहे, त्याचे कारण त्याने सांभाळलेली आर्थिक शिस्त. ती सुरवातीला जाचक वाटली तरी त्याची चांगली फळे आता आर्थिक स्थैर्याच्या माध्यमातून भारताला मिळू लागली आहेत.**

भारताचे शेजारी देश पाकिस्तान आणि श्रीलंकेत सध्या काय चालले आहे, याची जी माहिती समोर येते आहे, त्यावरून भारताने या कठीण कालखंडात देशाचे अर्थचक्र नियंत्रणात ठेवले आहे, असे खात्रीने म्हणता येईल. श्रीलंकेच्या आर्थिक संकटानंतर भारताची स्थितीही श्रीलंकेसारखी होऊ शकते, असे कोणत्याही आधाराशिवायची भविष्यवाणी करणारे तज्ज्ञ आपल्या देशात आहेतच. पुढील संकटांची चाहूल म्हणून अर्थतज्ज्ञांनी सरकारला सावध करणे, ही त्यांची जबाबदारीच ठरते. पण त्यासाठी दुसरे टोक गाठण्याची काही गरज नाही. विकसित देशांसह जगातील सर्वच देश आज कर्ज घेऊन चालले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे देशावर कर्ज आहे म्हणून देश संकटात सापडला असे अनुमान काढणे योग्य ठरत नाही. भारताचा विकासदर आणि इतर अनेक आर्थिक निकष भारताचे अर्थचक्र नियंत्रणात असल्याची साक्ष देतात.

### अनेक अटींनंतर पाकिस्तानला कर्ज

पाकिस्तानला गेल्या सहा जूनला जे कठोर आर्थिक निर्णय घ्यावे लागले आहेत, ते पाहता भारत आणि पाकिस्तानची तर आर्थिक स्थितीबाबत तुलनाही होऊ शकत नाही. बावीस कोटी लोकसंख्येच्या पाकिस्तानकडे आज केवळ १० अब्ज डॉलर इतका परकीय चलनाचा साठा आहे. (१९९०मध्ये भारतात साधारण अशीच स्थिती होती, त्यानंतर भारताला आपली बाजारपेठ खुली करावी लागली.) आयातीसाठी डॉलर मोजावे लागतात. हा साठा केवळ ४५ दिवसांची आयात करण्याइतका आहे. पाकिस्तानात हे काही अचानक झालेले नाही. गेल्या काही वर्षांपासून तेथे राजकीय अस्थैर्य असून त्यातून त्याची आर्थिक शिस्त बिघडली आहे. त्याचा परिणाम म्हणजे पाकिस्तानला वेळोवेळी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेकडे कर्ज मागण्याची वेळ येत असते. अशी वेळ पुन्हा आली असून त्यांनी दिलेल्या कर्जावर त्याला गुजराण करावी लागणार आहे. या संस्था जशा कर्ज वाटायला बसल्या आहेत, तशाच त्या-त्या देशातील व्यापार उदीमाचा हिस्सा घेवूनच कर्ज देतात, हे उघड आहे. पाकिस्तानलाही काही अटींवरच कर्ज मिळणार आहे. श्रीमंतांवर अधिक कर लावू, सरकारी अधिकाऱ्यांना नव्या मोटारी घेण्यास मनाई करू आणि पेट्रोल-डिझेलवरील सबसिडी काढून घेऊ, अशी हमी पाकिस्तानने दिल्यावरच त्याला कर्ज देण्याची तयारी नाणेनिधीने दाखविली आहे.

### आर्थिक बेशिस्त अंगलट

जेथे राजकीय अस्थैर्य असते, तेथे सत्ता टिकविण्यासाठी राज्यकर्ते जनतेला अनेक सवलती देण्याचे जाहीर करतात, पण त्या सवलती व्यवहार्य नसतात. पाकिस्तानातही तेच झाले. लोकानुनय म्हणून पेट्रोल-डिझेलवरील अनुदान वाढविण्यात आले. काळ्या पैशाच्या निर्मितीला अटकाव करण्यासाठीच्या उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. श्रीमंतांना महागड्या मोटारगाड्या आयात करण्यापासून रोखण्यात आले नाही. त्याचा परिणाम आता दिसू लागला आहे. सध्याचे अर्थमंत्री इस्माईल यांनी अनेक आर्थिक निर्बंध लावले जाणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यात कर चोरीला आळा




घालून ३४.८५ अब्ज डॉलर सरकारी खजिन्यात जमा होतील आणि त्यामुळे आर्थिक तूट कमी होईल, असे म्हटले आहे. यावरून पाकिस्तानातील करचोरी कोणत्या थराला गेली आहे, हे लक्षात येते. सध्या ८.६ टक्के आर्थिक तूट असलेला पाकिस्तान ४.९ टक्के तूट ठेवण्याची आशा अर्थमंत्री बाळगून आहेत. मात्र आर्थिक शिस्तीचा इतिहास नसलेला पाकिस्तान एका वर्षात हे साध्य करू शकेल, यावर सहजासहजी विश्वास बसत नाही. अर्थमंत्र्यांनी खासगीकरणाचा हुकमी समजला जाणारा एक्का बाहेर काढला आहे. त्यातून ९६ अब्ज पाकिस्तानी रुपये मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पाकिस्तान सरकारच्या मालकीचे उद्योग आणि मालमत्तेला खासगी उद्योजकांची तेवढी मागणी आहे, असे येथे गृहीत धरण्यात आले आहे. वास्तविक उद्योगाला पूरक धोरणे नसतील तर खासगी उद्योजक हा पुढाकार का घेतील, असा प्रश्न आहे. पेट्रोल-डिझेलवरील सबसिडी मागे घेण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागला असून त्यामुळे इंधन एकदम ४० टक्के महाग झाले आहे. अशा उपाययोजनांमुळे या वर्षात तेथे १३.७६ टक्के चलनवाढ होणार आहे. कमी उत्पन्नगटातील नागरिक ही महागाई सहन करू शकणार नाहीत. भारतापेक्षा पाकिस्तानमध्ये पेट्रोल-डिझेल स्वस्त आहे, अशा बातम्या माध्यमांत अनेकदा येत होत्या. पण आर्थिक शिस्त मोडून केलेल्या गोष्टी कशा देशाच्या अर्थचक्राच्या अंगलट येतात, हे आता स्पष्ट झाले आहे. अर्थात, पाक सरकारने हे पाउल काही स्वतःहून उचलले नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने कर्ज देताना ज्या अटी घालत्या आहेत, त्यानुसार हे निर्णय आता घेतले जात आहेत.

### श्रीलंकेला भारताची मदत

दुसरा शेजारी श्रीलंका हा भारताच्या तुलनेत खूपच छोटा असल्याने अनेक आर्थिक -सामाजिक निकषांत भारतापेक्षा चांगला मानला जात होता, पण ते निकष साध्य करताना त्यानेही कोणतीच आर्थिक शिस्त पाळली नाही, त्यामुळे अनेक श्रीलंकन नागरिकांवर देश सोडून जाण्याची वेळ आली आहे. एकाच घराण्याची सत्ता आणि त्याने घेतलेले उलटे सुलटे निर्णय, करदात्यांना देण्यात आलेल्या अमाप सवलती, कोरोना काळात घटलेली निर्यात, चीनकडून घेतलेल्या कर्जाचे गलेलठ्ठ हप्ते, सरसकट नैसर्गिक शेतीची करण्यात आलेली सक्ती अशा अनेक कारणांनी श्रीलंका आज दिवाळखोरीत गेला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि भारत त्याला त्यातून बाहेर येण्यासाठी मदत करत आहेत. पाकिस्तानवर नाणेनिधीने जशा जाचक अटी लादण्यास सुरुवात केली आहे, तशाच अटी श्रीलंकेवरही लादण्यात येत आहेत. इंधनावरील सबसिडी मागे घेणे आणि प्रत्यक्ष कर पद्धतीत दुरुस्ती करण्यास श्रीलंका तयार झाला आहे. तेथेही परकीय चलनाच्या साठ्याला ओहोटी लागल्याने इंधन घेण्यासही सरकारकडे चलन राहिलेले नाही. आता भारतीय तेल कंपन्या श्रीलंकेला मदत करत आहेत. पण हे सर्व करताना जी परिस्थिती उद्भवली, त्यातून तेथे दंगली उसळल्या. त्याचा विपरीत परिणाम पर्यटनावर झाला. श्रीलंकेच्या जीडीपीमध्ये या क्षेत्राचा १० टक्के वाटा होता. धान्याची, इंधनाची टंचाई आणि एकूणच आर्थिकदृष्ट्या असुरक्षितता, यामुळे तेथील महागाई ३३.८ टक्के वाढली आहे. भारताने अलीकडेच ५०० दशलक्ष डॉलरचे कर्ज मंजूर केल्याने या स्थितीत थोडी सुधारणा होते आहे. नाणेनिधीकडे चार अब्ज डॉलरची मागणी करण्यात आली आहे. अशा अनेक उपाययोजनांतून हा सुंदर देश आर्थिक संकटातून लवकर बाहेर येवो, अशी प्रार्थना आपण करूया.

### भारताने राखली आर्थिक शिस्त

कोरोना, राजकीय अस्थैर्य आणि आर्थिक शिस्तीचा अभाव, यामुळे पाकिस्तान आणि श्रीलंकेवर जी वेळ आली आहे, ती पाहता भारताने आर्थिक शिस्तीचा अवलंब करून तो अनर्थ टाळला आहे, असे आता म्हणता येईल. परिस्थिती विकोपाला जाऊ नये म्हणून सरकार नावाच्या यंत्रणेला काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. ते त्या-त्या वेळी जाचक वाटत असले तरी अंतिमतः देशाच्या हिताचे असतात, हाही धडा यातून घेता येईल. इंधनाचे दर वाढत असूनही भारताने त्यासाठी पुन्हा सबसिडी देण्याची पद्धत सुरु केली नाही. करपद्धतीत सुधारणा करून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांत याच काळात मोठी वाढ नोंदविली आणि दुसरीकडे आत्मनिर्भर सारख्या धोरणांच्या मदतीने परकीय चलनाचा साठा वाढवीत ठेवला, त्याची फळे आता आर्थिक स्थैर्याच्या माध्यमातून भारत घेतो आहे.

अर्थ प्रहर

यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

**भारत, पाकिस्तान आणि श्रीलंकेच्या आर्थिक स्थितीची ढोबळ तुलना**

| देश | परकीय चलनाचा साठा | चलनवाढ | पेट्रोलचे दर (एका लिटरला) | विकासदर | डॉलरच्या तुलनेत चलनाची झालेली घसरण |
|---|---|---|---|---|---|
| पाकिस्तान | १० अब्ज डॉलर | १३.७६ टक्के | २०९ रुपये (पाक) | ५.९७ टक्के | १७ टक्के (एका डॉलरला १५२ रुपये) |
| श्रीलंका | १.९२ अब्ज डॉलर | ३३.८ टक्के | ४२० रुपये (श्रीलंकन) | १ टक्का | ३३ टक्के (एका डॉलरला ३०० रुपये) |
| भारत | ६०० अब्ज डॉलर | ६.७ टक्के | ९६.७२ रुपये (भारतीय) | ८.७ टक्के | ४.५ टक्के (एका डॉलरला ७८.१८रुपये) |

(यातील काही आकडेवारी दररोज बदलत असते, पण यावरून एकूण आर्थिक स्थितीची कल्पना येते.)

# ‘इन्फोसिस’ने तीन दशकांत दिला भरभरून परतावा

**१४ जून रोजी इन्फोसिसच्या शेअर बाजारातील नोंदणीस २९ वर्षं होत आहेत. या २९ वर्षांत कंपनीने १६ हजार पटींपेक्षा जास्त परतावा दिलेला आहे, साधारणपणे ६३०० रु. भांडवलावर सुरु झालेली ही कंपनी आज सुमारे सव्वालाख कोटी वार्षिक उत्पन्न असलेली कंपनी ठरली आहे. त्यानिमित्ताने...**

**दिग्गज गुंतवणू**कदार वॉरन बफेट एकदा म्हणाले होते, कायमस्वरूपी गुंतवणूक करण्याच्या विचारानेच शेअर्स खरेदी करा. ही गोष्ट इन्फोसिस कंपनीच्या बाबतीत तंतोतंत खरी ठरताना दिसते. १४ जून रोजी इन्फोसिसच्या शेअर बाजारातील नोंदणीस २९ वर्षं होत आहेत आणि या २९ वर्षांत कंपनीने १६ हजार पटींपेक्षा जास्त परतावा दिलेला आहे. या कंपनीच्या आयपीओमधील एक शेअर्सचे १०२४ शेअर्स झालेले आहेत व एका शेअरचा भाव आज १५०० रुपये आहे. म्हणजेच १०२४ x १५००=१५,३६,०००. आज ही कंपनी १५०० रुपयांवर शेअर बाजारात व्यवहार होताना दिसते. जिचा उच्चांकी भाव १९५३ रुपयांवर गेलेला होता. आजच्या घडीस ही कंपनी भारतीय शेअरबाजारातील बाजारमूल्याप्रमाणे चौथ्या नंबरवर असून तिचे बाजार मूल्य हे सहा लाख कोटी रुपयांवर आहे.

१९९५साली मला इन्फोसिस या कंपनीची तोंड ओळख झाली व त्या कंपनीबद्दल, खरं तर तिच्या संस्थापकांबद्दल एक आदर वाटू लागला. आमच्याकडे पेईंग गेस्ट म्हणून राहणारे घनश्याम वागळे यांची इन्फोसिसच्या पुण्यातील सेव्हन लव्हज चौकातील वर्धमान बिल्डिंगमधील ऑफिसात सिनियर प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून नियुक्ती झालेली होती व त्यांच्याकडूनच मला इन्फोसिसबद्दल ऐकायला मिळायचे.

२ जुलै १९८१मध्ये श्री.नारायण मूर्ती यांनी सहा अभियंत्यांना बरोबर घेऊन केवळ २५० अमेरिकी डॉलर भांडवलावर इन्फोसिस कन्सल्टंट्स प्रा.लि. या नावाने पुण्यात कंपनी चालू केली. नंतर १९८३ साली कंपनीचे ऑफिस हे बेंगलोरला(आताचे बंगळुरू)हलविले. फेब्रुवारी १९९३मध्ये इन्फोसिसच्या प्राथमिक समभाग विक्रीचा प्रस्ताव (IPO) आला. त्याची ऑफर प्राईस ही रु.९५ होती व आश्चर्याची बाब म्हणजे तो आयपीओ पूर्ण भरला गेला नव्हता. त्यामुळे अमेरिकेच्या मॉर्गन स्टॅन्ले या कंपनीने १३ टक्के शेअर्स खरेदी केल्यामुळे तो आयपीओ यशस्वी (पूर्ण सबस्क्राईब) झाला. मग १४ जून १९९३रोजी इन्फोसिसच्या शेअर्सची नोंदणी (लिस्टिंग) १४५ रुपयांवर झाली. तब्बल ५३ टक्के वरती. मग १९९९ साली इन्फोसिसची अमेरिकन डिपॉझिटरी रिसिटद्वारे नॅसडॅक एक्स्चेंजवर नोंदणी झाली. २५० अमेरिकन डॉलरनी चालू झालेली कंपनी २०२१ या आर्थिक वर्षाच्या शेवटास १२१६४१ कोटी रुपये महसूल असलेली कंपनी झालीय. आता पाहूया या कंपनीने गुंतवणूकदारांना काय दिलेय?

कंपनीने १९९४ साली एकावर एक बोनस दिला, नंतर १९९७ व १९९९ मध्ये पुन्हा एका शेअरवर एक शेअर बोनस. म्हणजे सुरुवातीच्या एका शेअरचे झाले आठ शेअर्स. मग २००० साली कंपनीच्या शेअर्सचे विभाजन झाले म्हणजे १० रु. दर्शनी किंमत होती त्याऐवजी ५ रु. ही दर्शनी किंमत झाली. त्यामुळे आठ शेअर्सचे झाले १६ शेअर्स. नंतर २००४ मध्ये कंपनीने ३:१ म्हणजे एका शेअरवर तीन शेअर्स बोनस दिले




त्यामुळे १६ चे झाले ६४ शेअर्स. परत २००६, २०१४, २०१५ व सप्टेंबर २०१८ मध्ये कंपनीने एकास एक बोनस दिला म्हणजे ६४ शेअर्सचे झाले १०२४ शेअर्स.

यावरून एक विनोदी कथा जन्म घेते. १९९३ साली आपल्या पाल्याच्या अॅडमिशनसाठी डोनेशन न देता त्याच १०,००० रुपयांचे इन्फोसिसचे आयपीओमध्ये १०० शेअर्स घेतले असते. (शेअर्स लागले असते का नाही हा प्रश्नच नाही कारण आयपीओ पूर्ण भरला गेला नव्हता) तर आज त्याच १०,००० रुपयांचे १५ कोटी ५१ लाख रुपये झाले असते. (९ जूनचा बंद भाव रु.१५१५ लक्षात घेऊन) ते सुद्धा लाभांशापोटी मिळालेली रक्कम सोडून. याउलट हेच १०,००० रुपये १९९३ मध्ये एखाद्या कॉम्प्युटर कोर्ससाठी फी म्हणून भरून नंतर इन्फोसिसमध्येच काम करणाऱ्या अभियंत्यास अगदी पंचवीस वर्षांत आपली पुंजी साडेपंधरा कोटी नक्कीच करता आली नसती. ही गोष्ट नक्कीच सर्व बाजूंनी विचारात पाडणारी आहे त्यामुळे मुलांच्या भवितव्याबाबत विचार करताना त्यांच्या शिक्षणावर होणाऱ्या खर्चाव्यतिरिक्त त्यांच्यासाठी आपण काय व कशात गुंतवणूक केलीय हे विचारात घेणे क्रमप्राप्तच आहे. इथे गुंतवणूकगुरु वॉरेन बफे यांचे एक वाक्य नमूद करावेसे वाटते- 'Buy it thinking you will hold it forever.' कायमस्वरूपी गुंतवणूक करण्याच्या विचारानेच खरेदी करा.

महत्त्वपूर्ण डिजिटल व्यापकतेसह मोठ्या उद्योगांची सुरक्षा-परिपक्कता वाढविण्यासाठी आणि त्यांच्या गंभीर पायाभूत सुविधांवर सायबर हल्ल्यांचा धोका टाळण्यासाठी इन्फोसिसने Palo Alto Networks या जागतिक सायबर सुरक्षा लीडरशी दोनच आठवड्यांपूर्वी करार केला आहे. तर दोनच दिवसांपूर्वी कंपनीने जर्मनीतील डसेलडॉर्फ येथील जागतिक आघाडीच्या लिफ्ट कंपन्यांपैकी एक असलेल्या टीके लिफ्टसोबत जागतिक धोरणात्मक सहकार्याची घोषणा केली. पुन्हा सांगावेसे वाटते की ज्या कंपनीवर, तिच्या व्यवसायावर आपण विश्वास दाखवू शकतो व ज्या कंपन्यांचा व्यवसाय आपणास सद्सद्विवेकबुद्धीने भावतो/पटतो अशाच कंपन्या आपण गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने निवडाव्यात. कोणत्याही उत्पादनात आतमध्ये काय घटक आहेत हे वेष्टणावर छापलेल्या शब्दांमुळे आपणांस कळते व त्यावर आपण विश्वास देखील ठेवतो. उदा. नेस्ले कंपनीच्या दुधाच्या पावडरसोबत अजून काही




भेसळ नाही ना ? डाबरच्या टूथपेस्टमध्ये घातलेले सगळे घटक खरंच आपल्या दातांसाठी गरजेचे आहेत का ? विम सोपमध्ये खरंच लिंबूरस मिसळलेला असतो का ? आदि मग प्रश्न आहे की जर त्या (कंपनीच्या) वेष्टणावर किंवा त्यांच्या जाहिरातींवर विश्वास दाखवून आपण ती उत्पादने खरेदी करतो मग तितकाच विश्वास व संयम आपण त्या कंपन्यांबद्दल का नाही दाखवू शकत ?असो, ज्याचा त्याचा हा प्रश्न असतो. आज सुमारे चार दशकानंतरदेखील ही कंपनी आपले आयटी व्यवसायात अढळ स्थान टिकवून आहे. जरी आज हा शेअर आपल्या उच्चांकापासून सुमारे २५ टक्के खाली आलेला असला तरी आजच्या भावानुसार मागील पाच वर्षांत कंपनीच्या शेअर्सनी सव्वातीनपट परतावा दिलेला दिसतो. त्यामुळे असा अढळ परतावा देणारा मल्टिबॅगर आपल्या पोर्टफोलिओमध्ये नसल्यासच नवल. याचा बारकाईने विचार करणे गरजेचे आहे.


प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

## अर्थसाक्षर स्पर्धा : २२

### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. ऑटो क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***आ.*** एमएफआर

**प्रश्न क्र. २. माहिती तंत्रज्ञान म्हणजे आयटी क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***ई.*** एल अँड टी इन्फोटेक

**प्रश्न क्र. ३. मेटल क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***आ.*** रत्नमनी मेटल्स अँड ट्यूब

**अर्थसाक्षर स्पर्धा २२च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा २२साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. इन्फोसिस या प्रसिद्ध आयटी कंपनीचे सध्याचे सीईओ सध्या कोण आहेत?**

***अ.*** नारायण मूर्ती ***आ.*** विशाल सिक्का
***इ.*** सलील पारेख ***ई.*** नंदन निलकेणी

**२. १९९३ साली इन्फोसिस कंपनीचा आयपीओ आला होता. त्यावेळी त्याची ऑफर प्राईज किती होती?**

***अ.*** ९५ रुपये ***आ.*** ५०० रुपये
***इ.*** १२५ रुपये ***ई.*** १५०० रुपये

**३. इन्फोसिस कंपनीचे आज (ता. १० जून) चे बाजारमूल्य किती आहे?**

***अ.*** सहा लाख २१ हजार कोटी रुपये ***आ.*** सात लाख २१ हजार कोटी रुपये
***इ.*** पाच लाख ५० हजार कोटी रुपये ***ई.*** दहा लाख २१ हजार कोटी रुपये




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# भाजपच्या विजयाचा रायगड जिल्ह्यात जल्लोष


महाड
(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

राज्यसभेच्या तिन जागा जिंकून भाजपने इतिहास घडविला आहे. या विजयाचा सर्वत्र जल्लोष होत असताना महाड, माणगावमध्येही शनिवारी (दि. ११)आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

राज्यसभेच्या सहा जागांसाठी शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत भाजपचे पियुष गोयल, डॉ. अनिल बोंडे आणि धनंजय महाडीक यांचा विजय झाला. अत्यंत करेक्ट कार्यक्रम करुन माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना पाणी पाजले. त्याबद्दल महाड येथील भाजप कार्यकर्त्यांनी शनिवारी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जमून आनंदोत्सव साजरा केला. या वेळी सर्वांना पेढे वाटण्यात आले.

भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, महाड तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, संदिप ठोंबरे, डॉ. मंजुशा कुद्रीमोती, निलीमा भोसले, रश्मी वाझे, महेश शिंदे, नाना पोरे, निलेश तळवटकर, चंद्रजित पालांडे, राकेश वाघ, अप्पा सोंडकर, तुषार महाजन, धामनसे, विश्वतेज भोसले, करमरकर, जिगेशा बुटाला आदी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते या जल्लोषात सहभागी झाले होते. या वेळी घोषणाबाजीही करण्यात आली.

(छाया : सलीम शेख)

माणगाव

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीत तीन जागांवर भाजपचे उमेदवार निवडून आल्याबद्दल माणगावातील भाजप कार्यालयाजवळ शनिवारी (दि.११) सकाळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करीत विजयाचा आनंदोत्सव साजरा केला.

राज्यसभेच्या निवडणुकीत भाजपचे पियुष गोयल, अनिल बोंडे आणि धनंजय महाडीक हे तीन उमेदवार निवडून आल्याचे घोषित झाल्यानंतर माणगाव तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे आणि तालुका उपाध्यक्ष यशोधरा गोडबोले उपस्थितीत भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शनिवारी सकाळी माणगाव कार्यालयासमोर फटाक्यांची आतषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला.

भाजप महिला मोर्चाच्या माणगाव तालुका अध्यक्षा अश्विनी महाडीक, कोकण विभाग किसान मोर्चा महिला अध्यक्षा शर्मिला सत्वे, भटका समाज जिल्हा उपाध्यक्षा मेघा धुमाळ, तालुकाध्यक्षा नीलम काळे, तालुका उपाध्यक्ष बाबुराव चव्हाण यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

(छाया : शैलेश पालकर)

पोलादपूर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या जागांवर भाजपचे सर्व उमेदवार निवडून आल्याबद्दल पोलादपूर येथील भाजप कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मुंबई-गोवा महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ फटाके वाजवून शनिवारी (दि. ११) आनंद साजरा केला. भाजपचे शहराध्यक्ष राजा दिक्षित, जिल्हा कार्यकारिणी सदस्य राजन धुमाळ, युवा मोर्चा रायगड जिल्हा चिटणीस महेश निकम, पोलादपूर तालुका अध्यक्ष प्रतिक सुर्वे आणि सोशल मीडिया सेलचे क्षितीज धुमाळ यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.


नागोठणे
(छाया : राज वैशंपायन)

**नागोठणे : प्रतिनिधी**

राज्यसभेच्या निवडणुकीत भाजपचे सर्व उमेदवार विजयी झाल्याबद्दल नागोठण्यात शनिवारी (दि. ११) विजयोत्सव साजरा करण्यात आला.

या विजयोत्सवाची सुरुवात भाजप शहराध्यक्ष सचिन मोदी यांच्या कार्यालयातून करण्यात आली. या वेळी नागोठण्यातील वयोवृद्ध निराधार महिला वत्सला वाघमारे यांना वीणा मोदी यांच्या हस्ते साडी व भेटवस्तू देण्यात आल्या. सचिन मोदी यांनी त्यांचा वैद्यकीय खर्च उचलण्याचे मान्य केले.

त्यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात घोषणांबाजी आणि फटाक्यांची आतिषबाजी करून मिठाईचे वाटप केले.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मारुती देवरे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, शहराध्यक्ष सचिन मोदी, ज्येष्ठ नेते परशुराम तेलंगे, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, गौतम जैन, प्रियंका पिंपळे,रौफ कडवेकर, विठोबा माळी, तीरथ पोलिसांनी, शेखर गोळे, राजेंद्र देवरे, धनराज धुमाळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खालापुरात महिलेची हत्या, आरोपी २४ तासांत जेरबंद

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील रानसई बोरीची मळशी जंगल भागात एका अनोळखी महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला होता. या प्रकरणी खालापूर पोलिसांनी आरोपीला २४ तासांत जेरबंद केले आहे.



रानसई बोरीची मळशी जंगल भागात ६ जून रोजी एका अनोळखी महिलेचा जातीचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत आढळला होता. त्याच्या शवविच्छेदन अहवालात मुंबईच्या जे. जे. रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी डोक्यास झालेल्या दुखापतीने (क्शरव खपर्क्षीू) मरण असा अभिप्राय दिला असल्याने सदर महिलेचा खुन झाल्याचे स्पष्ट झाले. मात्र मृताची ओळख पटविणे अत्यंत कठीण व आव्हानात्मक होते. ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरू असताना उंबरे (ता. खालापूर) येथील काळुराम मारुती वाघमारे याने, पत्नी आशा बाघमारे ही मागील १५ ते २० दिवसापुर्वी कर्नाटक येथील राठोड मुकादम याचे सोबत कोळशाच्या भट्टीकरीता मजूर शोधण्यासाठी वावोशी व रानसई येथे गेली होती, तेव्हापासून ती बेपत्ता आहे, अशी तक्रार पोलीस ठाण्यात दाखल केली.

यानंतर तो मृतदेह आशा काळुराम वाघमारे हीचा असल्याचे निष्पन्न झाले. अधिक तपासात १० ते १५ दिवसापुर्वी आशा रानसई आदीवासीवाडीतील हिरामण जाधव याच्या घरी आली होती. ती सुनिल पवार व कुमार बाधे यांना कोळशाच्या भट्टीवर कामाकरीता घेवून जाणार होती. त्याकरीता तीने त्या दोघांना पैसे दिले होते. व लगेच कामावर जाण्यासाठी तगादा लावला सुरू केला होता. मात्र सुनिल पवार याची पत्नी शांता पवार ही लगेच भट्टीवर कामासाठी जाण्यास तयार नसल्याने सुनिल व शांता यांच्यात भांडण झाले. त्या रागातून रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास सुनिल पवार हा आशा वाघमारे हिला बोरीची मळशी नावाच्या जंगल भागाकडे घेवून गेला होता. त्यानंतर तो एकटाच घरी आला होता. त्यानंतर तो पत्नी, मुलांना घेवून कोठेतरी निघून गेला असल्याची माहिती खालापूर पोलिसांना मिळाली. यावरून हा खुन हा सुनिल यानेच केल्याची खात्री झाली.

दरम्यान, खालापूर पोलिसांनी आरोपी सुनिल श्रावण पवार याला हिरडगाव (ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) येथून ताब्यात घेतले असून, त्याने गुन्हाची कबुली दिली आहे. न्यायालयाने त्याला १५ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणी सुनील पवार याच्या विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहाय्यक निरीक्षक गणेश कराड करीत आहेत.

## पेणमध्ये उंचावरून पडून एकाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

जेएसबल्यूच्या धरमतर जेटीजवळ काम करताना ५२ वर्षीय इसम उंचावरुन खाली पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात अकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सुनिल रामदास पाटील हे त्यांच्या होडीवर उभे राहून जेएसडब्ल्यूच्या धरमतर जेटीवरील एक नंबर बिमला केबल अडकवण्यासाठी इलेक्ट्रिक मशिनने होल पाडत होते. त्यावेळी रमेश हिराजी म्हात्रे (वय ५२, रा. वाशी, ता. पेण) हे उंचावरून खाली पडले. त्यांना पेण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

---

### जाहीर नोटीस

माझ्या अशिल यांचे वतीने तमाम जनतेस या नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, माझे अशिल मे. क्रीश इंफ्रा ॲण्ड पार्टनर्स् यांनी श्री. सुनिल शिवराम पाटील, श्री. अनिल शिवराम पाटील, श्री. रामकृष्णा शिवराम पाटील यांच्याकडून खालील परीशिष्टात नमूद मिळकत आणि त्यामधील सर्व हक्क, अधिकार आणि फायदा ही विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे.

सबब सदरहू खालील **परीशिष्टा**मध्ये नमूद मिळकतीबाबत कोणाहि व्यक्ती / व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थेचे किंवा कंपनीचे, तसेच भागीदारी संस्थेचे सदर मिळकतीबाबत कुठल्याही प्रकारचे हक्क, दावा, हरकत जसे खरेदी, विक्री, विकासन अधिकार, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षीस, भेट, भाडेपट्टा, वारसहक्क, तारण, आगाऊ अमानत, डीक्री, भु-करार, कुळ-वहिवाट, इजमेंट, बुकींग, मनाई हुकुम किंवा इतर कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर संपूर्ण कागदपत्रांसहीत संपर्क साधावा अन्यथा हा व्यवहार अधिकृत आहे असे समजले जाईल व त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीशीद्वारे पुढे असे कळविण्यात येते की, १४ दिवसाच्या आंत अशी कोणतीही हरकत संपूर्ण कागदपत्रांसहीत न आल्यास वरील **परीशिष्टा**मध्ये नमूद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, हितसंबंध व अधिकार नाही वा असल्यास तो स्वेच्छेने सोडला आहे किंवा आमचे अशिल यांचे लाभात सोडला आहे, असे समजण्यात येईल. त्या नंतर आमचे अशिल एक प्रामाणिक विकसनदार म्हणून सदर मिळकतीच्या विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**परीशिष्ठ**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पनवेल तसेच जिल्हा **रायगड** परिषद यांचे हद्दीतील आणि मे. दुय्यम निबंधक, **पनवेल, जि. रायगड** यांचे अधिकार क्षेत्रातील गाव/ मौजे कोयनावळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील महसुल दप्तरीमध्ये खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेली शेत जमिन / मिळकत ह्या मिळकतीचे महसुल दप्तरी / सातबाराच्या उताराच्याप्रमाणे सर्वे / गट नंबर परिशिष्ट खालीलप्रमाणे :

| सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४३ | १/३ | ०-५८-१० | ६.२६ |
| | एकूण | ०-५८-१० | |
| | एकर | १ एकर १८ गुंठे | |

सही/-
वकील श्री. विशाल जाजु
२६९, सत्रा प्लाझा, प्लॉ.क्र. १९ व २०
सेक्टर-१९ डी, वाशी, नवी मुंबई-४००७०३
दूरध्वनी : ९८२०३१४९४५
ई मेल : juristchambers@gmail.com

---

### ग्रामपंचायत गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड
### जाहीर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत गव्हाण १५वा वित्त आयोग फंडातून खालील कामासाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत, तरी अधिकृत ठेकेदारांनी दि. १२/०६/२०२२ ते १७/०६/२०२२ पर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास सकाळी ११:०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील. त्या वेळी उपस्थित रहावे. कोणतेही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

| अ. नं. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे गव्हाण येथील प्रशांत भगत ते चार फाटा पर्यंत आर.सी.सी. गटार बांधकाम करणे. | २९०४७१/- | २९०५/- | ५००/- | ३ महिने | ग्रामपंचायत फंड |

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. सदर कामांचे अंदाजपत्रकिय रक्कम ३०००००/- वरील सर्व कामांना नोंदणीकृत (रजिस्ट्रेशन) ठेकेदारांनीच कामाची निविदा भरावी.
३. इसारा रक्कम व निविदा फी रोखीत भरावी लागेल.
४. निविदा फी ना परतावा समजावी.
५. नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल. तसेच पॅनकार्डची झेरॉक्स सोबत जोडणे बंधनकारक राहील.
६. अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
७. निविदा मंजूर केल्यास रूपये १००च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा द्यावा लागेल.
८. सुरक्षा अनामत रक्कम ५%, इन्कमटॅक्स २.३०%, ग्रामपंचायत विकास निधी ५%, वर्क इन्शुरन्स् १% अशा रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
९. सुरक्षा अनामत ९० दिवसांनी कामांचा दर्जा पाहून परत मिळेल.
१०. कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतील काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
११. सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करणेचे आहे.
१२. वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.
१३. काम चालू करताना फोटो, काम चालू असताना फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचा फोटो बंधनकारक राहील.
१४. सदर कामाचे बील रक्कम रूपये २,५०,०००/-च्या पुढील रक्कमेवर १% जी.एस.टी तसेच १% सी.एस.टी कर कापणे अनिवार्य आहे. ठेकेदाराकडे जी.एस.टी. व सी.एस.टी. नंबर असणे बंधन कारक राहिल.

सही/- सरपंच, ग्रामपंचायत गव्हाण
सही/- ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत गव्हाण

---

ॲड. आशा अरुणकुमार भगत
मोबाईल क्रमांक ८१०८३५५०००

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ. अर्ज क्र. ७१९/२०२२
निशाणी क्रमांक ८ ड
ने.ता. १३/७/२०२२

१. श्रीमती. विभा उर्फ बिवा राणी धारा
वय ५३ वर्षे, धंदा-गृहिणी
२. कुमार अभिक अशोक धारा
वय १७ वर्षे, धंदा-शिक्षण
अज्ञान पालनकर्ते तर्फे
श्रीमती. बिवा राणी धारा
सर्व रा. डी-८५, रुम क्रमांक ०२, सेक्टर ०७,
नवीन पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ ... अर्जदार

सदरहू अर्जदार क्र. १ यांचे पती व क्रमांक २ यांचे वडील कै. अशोक कुमार धारा हे दिनांक ०९/११/२०१८ रोजी टाटा हॉस्पीटल मुंबई येथे मयत झाले आहेत. व कै. लता धारा ही सुमारे १५ वर्षेपूर्वी मयत झाली आहे. त्यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणून नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. अशोक कुमार धारा यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहू अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :-

कै. लता धारा (मयत मूळ पुरुषाची मयत आई)
↓
कै. अशोक कुमार धारा (मयत मूळ पुरुष)
↓
श्रीमती. विभा उर्फ बिवा राणी धारा (मयत मूळ पुरुषाची पत्नी)
↓
कुमार अभिक अशोक धारा (मयत मूळ पुरुषाचा मुलगा)

**मौजे-कामोठे, पनवेल येथील सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंटचे नाव व क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| मनिष मकरंद को.ऑ.हौ.सो. सदनिका क्रमांक २०३ | १५८ बी | १४ | २०,००,०००/- |

सदरहू सदनिका कै. अशोक कुमार धारा व श्रीमती बिवा राणी धारा यांच्या नावे होती व कै. अशोक कुमार धारा ही व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे सदनिका आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात कै. अशोक कुमार धारा यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर भूखंड हस्तांतरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रिक बाबींचा अडथळा येऊ नये ह्या कारणास्तव वरील मयत व्यक्तींचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करून मागत आहेत.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

**पनवेल**
**दिनांक : ८/६/२०२२**

सही/- क. लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल | शिक्का | सही/- सह. अधीक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

ॲड. आशा अरुणकुमार भगत

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ. अर्ज क्र. ६४९/२०२२
निशाणी क्रमांक ८ ड
ने.ता. २९/६/२०२२

१. श्रीमती. प्रेमादेवी खीमानंद पांडे
२. सौ. चंद्रकला हरीष उपाध्यय
उर्फ कुमारी चंद्रकला खीमानंद पांडे
रा. ३०३, त्रिमुर्ती सदन, प्लॉट ब/८७-८८,
नागेश्वर तलावाजवळ, सेक्टर २३, दारावे गाव, नवी मुंबई
३. कुमारी किरण खीमानंद पांडे
रा. २४/अे, हायवे मिल्टन को.हौ.सो., बनसी नगर,
कुलुपवाडी रोड, मशिदीजवळ, बोरीवली (पू.), मुंबई ४०००६६
४. कुमारी मीनाक्षी खीमानंद पांडे
५. कुमारी छाया खीमानंद पांडे
६. कुमारी ज्योती खीमानंद पांडे
क्रमांक १, ४ ते ६, रा. ६०२, आर्यन को.ऑ.हौ.सो.,
प्लॉट क्रमांक ५६, सेक्टर २१, कामोठे, रायगड ४१०२०६

सदरहू अर्जदार क्र. १ यांचे पती व क्रमांक २ ते ६ यांचे वडील कै. खीमानंद जयदत्त पांडे हे दिनांक १३/०८/२०२० रोजी वरळी मुंबई येथे मयत झाले आहेत. व कै. खष्टी जयदत्त पांडे ही सुमारे १५ वर्षेपूर्वी मयत झाली आहे. त्यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणून नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. खीमानंद जयदत्त पांडे यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहू अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :-

कै. खष्टी जयदत्त पांडे (मयत मूळ पुरूषाची मयत आई)
कै. खीमानंद जयदत्त पांडे (मयत मूळ पुरुष)
↓
श्रीमती. प्रेमादेवी खीमानंद पांडे (मयत मूळ पुरुषाची पत्नी)
↓
सौ. चंद्रकला हरीष उपाध्यय उर्फ कुमारी चंद्रकला खीमानंद पांडे (मयत मूळ पुरुषाची मुलगी)
↓
कुमारी किरण खीमानंद पांडे (मयत मूळ पुरुषाची मुलगी)
↓
कुमारी मीनाक्षी खीमानंद पांडे (मयत मूळ पुरुषाची मुलगी)
↓
कुमारी छाया खीमानंद पांडे (मयत मूळ पुरुषाची मुलगी)
↓
कुमारी ज्योती खीमानंद पांडे (मयत मूळ पुरुषाची मुलगी)

सदरहू कै. खीमानंद जयदत्त पांडे यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावाची नोंद असलेल्या सदनिकेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मौजे-कामोठे, पनवेल येथील सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंटचे नाव व क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| आर्यन को.ऑ.हौ.सो. सदनिका क्रमांक ६०२ | ५६ | २१ | १९,५०,०००/- |

सदरहू सदनिका कै. खीमानंद जयदत्त पांडे व श्रीमती प्रेमादेवी खीमानंद पांडे यांच्या नावे होती व कै. खीमानंद जयदत्त पांडे ही व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे सदनिका आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात कै. खीमानंद जयदत्त पांडे यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर भूखंड हस्तांतरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रिक बाबींचा अडथळा येऊ नये ह्या कारणास्तव वरील मयत व्यक्तींचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करून मागत आहेत.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

**पनवेल**
**दिनांक : ९/६/२०२२**

सही/- क. लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल | शिक्का | सही/- सह. अधीक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

# नवी मुंबईत कर्णकर्कश ८२ सायलेन्सर जप्त

## वाहतूक पोलिसांची बुलडोझरद्वारे कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाहनांमधील सायलेन्सरमध्ये अनावश्यक बदल करीत शहरांत विविध कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली असल्याने ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढले आहे. यामुळे नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी अशा वाहनांवर कारवाई करीत सायलेन्सर जप्त केले होते. अशा ८२ सायलेन्सरवर बुलडोझरद्वारे शुक्रवारी (दि. १०) एकाचवेळी कारवाई करण्यात आली.

या वेळी वाहतूक पोलिसांनी अशा शांतता भंग करणाऱ्या वाहनांवर पुढील काळात कारवाईत सातत्य ठेवण्यात येणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले. पामबीच रस्त्यावर नवी मुंबई मुख्यालयाजवळ ही कारवाई करण्यात आली. यासाठी मुख्यालयाची पूर्वपरवानगी



घेण्यात आल्याचे वाहतूक विभागाने सांगितले.

वाहनांमध्ये विशेषत: दुचाकींमधील हॉर्नच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होत असल्याने सायलेन्सर लावले जात आहेत, मात्र वाहनचालक यात बेकायदा बदल करीत असून यामुळे विविध प्रकारचे कर्णकर्कश आवाज काढले जात आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी आणि वायू प्रदूषण होत असून नागरिक व इतर वाहनचालकांची शांतता भंग होत असते. अशा बेकायदा बदल केलेल्या वाहनांवर नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत कारवाई करीत त्यांचे सायलेन्सर जप्त केले होते. जप्त केलेल्या ८२ सायलेन्सर नष्ट करण्याची कारवाई शुक्रवारी करण्यात आली. रस्त्यावर हे सायलेन्सर ठेवून त्यावर बुलडोझरद्वारे ते नष्ट करण्यात आले.

सायलेन्सरमध्ये बेकायदा बदल करणाऱ्या वाहनांचा शोध घेऊन त्यावर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. नागरिकांना अशी वाहने आढळून आल्यास नवी मुंबई पोलीस वाहतूक विभागाच्या हेल्पलाइनवर (७७३८३९३८३९) संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'पथविक्रेता आत्मनिर्भर निधी'ची अंमलबजावणी

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकाने १ जून २०२० रोजी कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री पथविक्रता आत्मनिर्भर निधी योजनेची अंमलबजावणी करण्याची घोषणा केली. त्याची अंमलबजावणी संपूर्ण राज्याप्रमाणेच नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये करण्यात येत असून या योजनेस जोडून केंद्र सरकारने स्वनिधी से समृद्धी या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केलेले आहे.



(संग्रहित छायाचित्र)

यानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ज्या पात्र पथविक्रेत्यांनी यापूर्वी रुपये दहा हजार रक्कमेची यशस्वीपणे परतफेड केली आहे, अशा एकूण ४,६७६ पात्र पथविक्रेत्यांचे सामाजिक, आर्थिक प्रोफाईल आपल्या जवळच्या विभाग कार्यालयात जाऊन माहिती सादर करणे आवश्यक आहे.

पात्र पथविक्रेत्यांनी आपली नोंदणी जवळच्या महानगरपालिका विभाग कार्यालयात जाऊन करून घ्यावी. पात्र लाभार्थ्यांनी सोबत कुटुंबातील सर्व व्यक्तींचे आधारकार्ड, रेशनकार्ड व रुपये दहा हजार रक्कमेच्या कर्जाकरिता रजिस्टर्ड केलेला मोबाइल सोबत घेऊन जाणे आवश्यक आहे याची नोंद घेण्यात यावी, असे आवाहन पालिकेने केले आहे.

# वृक्षछाटणी करताना विजेचा धक्का लागून कामगाराचा मृत्यू

## वाशीतील घटना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळापूर्व कामे म्हणून गृहसंकुलातही वृक्ष छाटणीची कामे सुरू आहेत. वाशीतील एमजी या मोठ्या गृहसंकुलात वृक्ष छाटणी करताना विजेचा धक्का लागून एका कामगाराचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी १२च्या दरम्यान घडली. घटनास्थळ वाशी कौपरखैरणे रस्त्यालगत असल्याने बघ्यांची गर्दी झाल्याने या रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. यामुळे अग्निशमन दलाचे वाहन पोहचण्यासही उशीर झाला. सुमारे एक तास मृतदेह झाडावर लटकून होता.

गौतम यादव असे या मयत कामगाराचे नाव आहे. वाशीतील एमजी कॉम्प्लेक्समधील अलकनंदा सोसायटीत वृक्षछाटणीचे काम सुरू होते. वृक्षछाटणीसाठी यादव हा कर्मचारी झाडावर चढला होता. या झाडातून उच्च दाबाची विद्युतवाहिनी गेली होती. हे लक्षात न आल्याने त्याचा या वाहिनीला स्पर्श झाल्याने त्याला विजेचा मोठा धक्का बसला. या वेळी मोठा जाळ झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या धक्क्यात हा कामगार झाडावरच लटकून पडला. भीतीपोटी अन्य कामगारांनी तेथून पळ काढला.

वृक्षछाटणीसाठी या संकुलाने परवानगी घेतली होती का, असा प्रश्न उपस्थत होत आहे. मात्र याबाबत पालिकेच्या वाशी विभाग अधिकारी सुखदेव येडवे यांना विचारले असता या सोसायटीने परवानगी घेतली होती, मात्र स्वत:च्या जोखमीवरही सोसायट्यांना वृक्षछाटणी करता येते असे सांगितले.

कामगाराचा मृतदेह पुढील तपासणीसाठी पाठवण्यात आला असून शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे कारण समजू शकणार आहे. तसेच संबंधित कंत्राटदारावर सुरक्षा साहित्य न पुरवल्याने हलगर्जीपणा केल्याचा गुन्हा दाखल केला जाईल, अशी माहिती वाशी पोलिसांनी दिली.

# वाढत्या कोरोना रुग्णसंख्येमुळे जंतुनाशक फवारणी करावी

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरामध्ये कोरोना रुग्णाची संख्या चाललेली दिसून येत आहे. आलेल्या आकड्यानुसार नवी मुंबई शहरामध्ये कोरोनाचे २२२ रुग्ण होते. या सातत्याने वाढत्या संख्येचा धोका लक्षात घेता जंतुनाशक फवारणी करावी, अशी मागणी भाजपच्या माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी आयुक्तांकडे केली आहे.

**भाजपच्या माधुरी सुतार यांची मागणी**

पूर्वी कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तीच्या घराजवळचा परिसर आणि गर्दीचे ठिकाणे जसे बाजारहाट, बस स्थानक, रेल्वे स्थानक, कार्यालये, तसेच इतर कार्यक्रम वैगरे. अशा ठिकाणी आपण न.मु.म.पा.तर्फे जंतुनाशक फवारणी करत असू. आता मिळालेल्या माहितीनुसार गेले दोन महीने अशा प्रकारची जंतुनाशक फवारणी बंद आहे. सतर्कता म्हणून पुन्हा अशा पद्धतीची जंतुनाशक फवारणी नवी मुंबई शहरात सुरू कराव, अशी मागणी माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी केली आहे.

# नवी मुंबई विमानतळबाधितांची पुनर्वसन प्रक्रिया अंतिम टप्प्यात

## सिडकोचा दावा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळातर्फे साकारण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प क्षेत्रातील गावांमधील एकूण ३०७० बांधकामे निष्कासित करण्यात आली असून ११६० हे. क्षेत्रफळ विमानतळ सवलतदारांना हस्तांतरीत करण्यात आले आहे. तसेच या गावांतील सुमारे ५,००० हून अधिक कुटुंबांचे पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रातील पुनर्वसन प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचा दावा सिडकोने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.

सिडकोतर्फे रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यामध्ये १० गावे संपादित करून ११६० हेक्टर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. एका राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी या गावांतील ग्रामस्थ देत असलेले योगदान लक्षात घेऊन सिडकोतर्फे या प्रकल्पबाधितांना पुनर्वसन पॅकेज देण्यात आले आहे. तसेच विमानतळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाकरिता सिडकोतर्फे विमानतळ क्षेत्रालगत पुष्पक नगर हे पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्र विकसित करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता सिडकोला प्रत्येक टप्प्यावर प्रकल्पबाधितांचे उत्तम सहकार्य लाभले. आतापर्यंत विमानतळ गाभा क्षेत्रातील ३,०७० इमारती सिडकोकडून निष्कासित करण्यात आल्या आहेत. निष्कासित करण्यात आलेल्या इमारतींमधील ५,००० हून अधिक कुटुंबांचे पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रात स्थलांतर करण्याचे प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे, असा दावा सिडको करीत आहे.

**प्रकल्पबाधितांच्या सहकार्यामुळेच विमानतळ प्रकल्पातील आजवरचे महत्त्वाचे टप्पे सिडकोने यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे पूर्ण क्षेत्र विकासासाठी उपलब्ध करून देण्याचे आव्हानात्मक कामदेखील यास अपवाद नव्हते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प नियोजित वेळेनुसार पार पडत असून हा प्रकल्प मार्गी लागला आहे.**

**-डॉ. संजय मुखर्जी, एमडी, सिडको**

# बारावीच्या परीक्षेत खारघरमधून प्रथम तीन आलेल्या विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

**खारघर : प्रतिनिधी**

बारावीचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या निकालात अनेकांनी बाजी मारत आयुष्याच्या पुढील वाटचालीसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. खारघर शहरात बारावीमध्ये प्रथम तीन आलेल्या विद्यार्थ्यांना खारघरचा राजा एज्युकेशन सोसायटी सन्मानित करत या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ म्हणून आर्थिक स्वरूपात बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

संस्थेच्या अध्यक्ष मीनल विजय पाटील यांनी याबाबत शहर प्रथम तीन येणाऱ्या विद्यार्थ्यांनी खारघर चॅरिटेबल संस्थेकडे संपर्क साधण्याचे अवाहन केले आहे. खारघर शहरात बारावीत प्रथम तीन येणाऱ्या विद्यार्थ्यांना ५५५५ रुपये, ३३३३ रुपये आणि २२२२ रुपये आर्थिक स्वरूपात देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. दरवर्षी अशाप्रकारे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात येणार असल्याचे या वेळी ट्रस्टचे संस्थापक विजय पाटील यांनी सांगितले.

# आय लव्ह नेवाळी फलकाचे अनावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप कार्यकर्ते विश्वास काथारा नेवाळी यांचा वाढदिवस शुक्रवारी (दि. १०) झाला. वाढदिवसाचे औचित्य साधून नेवाळी आदई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच स्व. आत्माराम काथारा यांच्या स्मरणार्थ आय लव्ह नेवाळी या नामफलकाचे अनावरण पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील आणि भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या हस्ते झाले.




या कार्यक्रमाला भाजप ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, उपसरपंच योगेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिता काथारा, अशोक भोईर, महादेव गडगे, सत्याभाई खांडे, शेखर शेळके, धनाजी पाटील, प्रकाश खानावकर यांच्यासह कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# एचएससी परीक्षेत विद्याभवनचे उज्ज्वल यश


**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शैक्षणिक संकुलातील ज्युनियर कॉलेज विभागाने मार्च २०२२मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचे निकाल ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाले. विद्याभवनच्या विज्ञान व वाणिज्य या दोन्ही शाखांचा निकाल शंभर टक्के लागला. विज्ञान विभागातून अमेय राजेंद्र सुरवसे हा विद्यार्थी ८७ टक्के गुण मिळवून प्रथम तर आर्यन चंद्रशेखर यादव व वेदांगी भूषण शास्त्रकार यांनी अनुक्रमे ८६.१७ टक्के व ८१ टक्के मिळवून द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला वाणिज्य विभागातून सीमा रामसिंग खरवड ही विद्यार्थिनी ८८.८३ टक्के मिळवून प्रथम आणि अंश कुमार सिंग व स्नेहा भीमराव कांबळे यांनी अनुक्रमे ८३.८३ टक्के व ८१.३३ टक्के मिळवून द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. एकूण १३० विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थ्यांनी उच्च प्राविण्य, ९० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर २४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.



अमेय सुरवसे




सीमा खरवड

पुणे विद्यार्थी गृहाचे माजी कार्याध्यक्ष कृ. ना. शिरकांडे, संचालक राजेंद्र बोऱ्हाडे, दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका राजकुमारी इंदलकर, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, प्रा. सुजय वाबळे तसेच सर्व शिक्षक आणि पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नवी मुंबईतील काव्यचित्रभिंतींची अशोक नायगावकरांकडून प्रशंसा

**नवी मुंबई : बातमीदार**

शारीरिक आरोग्य जपणूकीप्रमाणेच मानसिक आरोग्याची जपणूकही तितकीच महत्त्वाची आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने संपूर्ण शहरात पन्नासहून अधिक ठिकाणी मराठीतील नामवंत कवींच्या प्रसिद्ध कवितांचे चित्ररूप दर्शन घडविणाऱ्या चित्रभिंती उभ्या केल्या आहेत. हीच अतिशय आगळीवेगळी गोष्ट असून त्याबद्दल महापालिकेचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे, अशा शब्दांत सुप्रसिध्द कवी अशोक नायगावकर यांनी दिलखुलास अभिप्राय दिला.



१७ डिसेंबर २०२१ रोजी स्वच्छ सर्वेक्षण मोहिमेंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेने विष्णूदास भावे नाट्यगृहात आयोजित केलेल्या मराठीतील नामवंत कवींच्या स्वच्छ कवी संमेलनात अशोक नायगावकर यांनी नवी मुंबईसारख्या एखाद्या शहरात मराठी भाषेचे वैभव दर्शविणाऱ्या कवितांच्या ओळी ठिकठिकाणी प्रदर्शित केल्या जाव्यात, अशी सूचना कविता सादर करताना केली होती.

या सूचनेच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी शहर सुशोभिकरणात विविध संकल्पना राबविल्या जात असताना शहरातील मुख्य चौक, वर्दळीची ठिकाणे, रस्त्यांवरील दर्शनी जागा येथे मराठीतील नामवंत कवींच्या ओळी पूरक चित्रांसह साकारण्याची आखणी केली. यासाठी नामांकित कवींच्या प्रसिध्द कवितांच्या ओळींची निवड करण्यात आली. सुप्रसिध्द सुलेखनकार अच्युत पालव यांनी सुलेखनातून त्या कवितांमधील भावार्थाला अक्षर आकार दिला. जे जे स्कूल ऑफ आर्ट्स, रचना संसद, रहेजा आर्ट स्कूल येथील विद्यार्थी कलाकारांनी तसेच स्थानिक उत्तम चित्रकारांनी त्या कवितांच्या ओळींना अनुरूप चित्रे काढून नवी मुंबई ठिकठिकाणी कवितांच्या चित्रभिंती सजविल्या.

या चित्रभिंतींची सुप्रसिध्द कवी अशोक नायगावकर यांनी प्रत्यक्षस्थळी भेट देत पाहणी केली व अशा प्रकारची वेगळी सूचना केल्यानंतर केवळ सहा महिन्यांच्या अवधीत इतक्या सुंदर आणि अप्रतिम रितीने कविता संकल्पना साकारल्याबद्दल आयुक्त अभिजित बांगर आणि संबंधितांचे कौतुक केले.ज

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने दिघ्यापासून बेलापूरपर्यंत संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, केशवसुत, गोविंदाग्रज, कवी यशवंत, बा. सी. मर्ढेकर, बालकवी, साने गुरुजी, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, वसंत बापट, सुरेश भट, ग्रेस, नारायण सुर्वे, इंदिरा संत, बहिणाबाई, शांता शेळके, ग. दि. माडगुळकर, जगदीश खेबुडकर, नामदेव ढसाळ अशा अनेक नामवंत कवींच्या प्रसिध्द कवितांच्या ओळी ५२ ठिकाणी चित्रांकित करण्यात आलेल्या आहेत. या चित्रकविताभिंतींच्या माध्यमातून नवी मुंबई शहर कवितांचे शहर म्हणून नावाजले जात आहे याचा सार्थ आनंद कविवर्य अशोक नायगावकर यांनी व्यक्त केला.

# सिटी ग्रंथालयाची वास्तू असणार पर्यावरणपूरक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईची ओळख नॉलेज सिटी म्हणूनही असून या उपमेला साजेसे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ग्रंथालय नवी मुंबईत असावे या भूमिकेतून सिटी लायब्ररी म्हणून ओळखली जाईल अशाप्रकारचे अद्ययावत ग्रंथालय सानपाडा, सेक्टर ११ येथे उभारले जात आहे. ही वास्तू पर्यावरणपूरक ग्रीन बिल्डींग म्हणून उभारावी तसेच यात विविध भाषांतील ग्रंथसंपदा असावी असे निर्देश आयुक्तांनी नियोजन बैठकीत दिले.

जुईनगर रेल्वे स्टेशननजीक, सेक्टर ११, सानपाडा येथे प्लॉट क्र. १ सिडकोकडून पालिकेस हस्तांतरित झाला असून याठिकाणी चार मजली ग्रंथालय उभारण्यात येत आहे. या ग्रंथालय इमारतीत नवी मुंबई क्षेत्रातील विविध भाषिक नागरिकांचा विचार करून मराठी व इंग्रजी भाषेप्रमाणेच विविध भाषेतील विपुल ग्रंथसंपदा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश देत तशा प्रकारची वैविध्यपूर्ण दालने या इमारतीमध्ये असावीत असेही आयुक्तांनी सूचित केले.



**आयुक्तांनी घेतलेल्या बैठकीत निर्णय**

**नवी मुंबईचे भूषण ठरणारी आणखी एक वास्तू या ग्रंथालयाच्या रुपाने शहरात उभारली जावी यादृष्टीने महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी विशेष बैठक घेत या मध्यवर्ती ग्रंथालयाच्या उभारणीबाबत विस्तृत चर्चा केली. यामध्ये सिटी लायब्ररीची वास्तू पर्यावरणपूरक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.**

ग्रंथालय वास्तू उभारताना ही वास्तू पर्यावरणपूरक ग्रीन बिल्डींग म्हणूनच उभारली जावी अशाप्रकारे वास्तूरचना करण्याचे निर्देश देत ही इमारत कार्बन न्युट्रल असावी असेही आयुक्तांनी निर्देशित केले. त्याठिकाणी साहित्य विषयक उपक्रम साजरे करण्यासाठी प्रेक्षागृहासह रंगमंच उपलब्धता, ग्रंथरचनेचा इतिहास प्रदर्शित करण्यासाठी नाविन्यपूर्ण रचना, दिव्यांगांना ग्रंथालयात सहजपणे वावरता यावे, ब्रेल लिपीतील पुस्तकांची सुविधा, अशा विविध बाबींचा समावेश करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

वाचन संस्कृतीमध्ये कालानुरुप होत असलेले बदल लक्षात घेऊन या अद्ययावत ग्रंथालयात ऑडिओ लायब्ररी, ई लायब्ररीची अत्याधुनिक स्वरूपाची व्यवस्था करण्याबाबतही आयुक्तांनी मौलिक सूचना केल्या. ग्रंथालय वास्तू उभारताना ही वास्तू पर्यावरणपूरक ग्रीन बिल्डींग म्हणूनच उभारली जावी अशाप्रकारे वास्तूरचना करण्याचे निर्देश देत ही इमारत कार्बन न्युट्रल असावी असेही आयुक्तांनी निर्देशित केले. यादृष्टीने सदर वास्तूत प्रकाश आणि हवा खेळती रहावी अशाप्रकारे वास्तू विशारदांनी केलेल्या रचनेची आयुक्तांनी प्रशंसा केली. येथे येणाऱ्या वाचकांसाठी पुरेशी वाहनतळ व्यवस्था करणेबाबतही आयुक्तांनी सूचना केल्या.

या बैठकीमध्ये वास्तूविशारदांनी त्यांच्या वास्तूरचनेच्या संकल्पना मांडणारे सादरीकरण केले. त्यावर सविस्तर विचारविनीमय करण्यात आला. या वेळी शहर अभियंता संजय देसाई उपस्थित होते. ही वास्तू उभारताना त्यामध्ये लेट्स रिड फाऊंडेशन या व्यापक वाचन चळवळ राबविणार्या नामांकित संस्थेचे विशेष मार्गदर्शन लाभत आहे. नवी मुंबई शहराला या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियोजित सेंट्रल लायब्ररीमुळे वाचन संस्कृती जपणारे शहर म्हणून नवी ओळख मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# खालापुरात शिवसेना-राष्ट्रवादी आमनेसामने!

## ▪ नियोजित रॉकिंग बॉम्बे बेव्हरेज कारखान्याच्या जनसुनावणीदरम्यान संघर्ष

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील प्रस्तावित मे. रॉकिंग बॉम्बे बेव्हरेज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या शुक्रवारी (दि. १०) झालेल्या जनसुनावणीदरम्यान शिवसेना व राष्ट्रवादी आमने-सामने उभे ठाकल्याचे चित्र पहायला मिळाले.

धान्यापासून इथेनॉल व एक्स्ट्रा अल्कोहॉल उत्पादन करणाऱ्या बहुचर्चित मे. रॉकिंग बॉम्बे बेव्हरेज प्रायव्हेट लिमिटेड कंपनी खालापूर तालुक्यातील उसरोली व खानाव ग्रामपंचायत हद्दीत कारखाना उभारणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, खालापूर तालुका प्रशासनाकडून शुक्रवारी जनसुनावणी घेण्यात आली होती. या जनसुनावणीत शिवसेना सोडून अन्य सर्व पक्षीय नेत्यांनी व बहुसंख्य स्थानिक नागरिकांनी विकासाच्या बाजूने कौल देत सदर कारखाना उभासरणीचे जोरदार स्वागत केल्याने शिवसेना मात्र एकटी पडली. प्रदूषण व अन्य कारणे सांगून प्रस्तावित कारखान्याला शिवसेनेने केला विरोध केला.

रायगडच्या अप्पर जिल्हा अधिकारी पद्मश्री बैनाडे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली व तहसीलदार आयुब तांबोळी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे रायगड प्रादेशिक अधिकारी वी. वी. किल्लेदार यांच्या उपस्थितीत ही जनसुनावणी घेण्यात आली. या जनसुनावणीला प्रस्तावित कारखाना क्षेत्रातील बाधित गावे व दहा किमी परिसरातील ग्रामस्थ, सर्वपक्षीय नेते, आजी-माजी लोकप्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजित ३०० कोटींची गुंतवणूक असलेल्या व सुमारे २५० जणांना रोजगार व नोकऱ्या देणाऱ्या या



(छाया : विनायक माडपे)

कारखान्यात धान्यावर प्रक्रीया करून दररोज १२५ केएलपीडी इथेनॉल व १२५ केएलपीडी एक्स्ट्रा अल्कोहोल निर्मिती करण्यात येणार आहे. जनसुनावणीत कारखाना व्यवस्थापनच्या तांत्रिक, पर्यावरण व औद्योगिक सुरक्षा विभागाकडून कारखान्याची उत्पादन प्रणाली, कच्चा माल, इंधन, पर्यावरण संवर्धन यासाठी उभारण्यात येणाऱ्या यंत्रणा व उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

जनसुनावणीत शिवसेना नेते रघुनाथ शिंदे, रोहित विचारे, उमेश गावंड व अन्य पदाधिकाऱ्यांनी कंपनीमुळे प्रदूषण वाढेल व त्यातून स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात येईल, असे सांगून कारखान्याला विरोध केला. दुसरीकडे माजी जिल्हा परिषद सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष नरेश पाटील, कंपनी परिसरातील देवन्हावे सरपंच अंकित साखरे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष एच. आर. पाटील, विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष ॲड. संतोष बैलमारे, युवक पदाधिकारी भूषण पाटील, भाजपचे सनी यादव यांच्यासह उसरोलीचे सरपंच, पंचक्रोशीतील सर्व पक्षीय पदाधिकारी व ग्रामस्थांनी मात्र कंपनी आल्यावर स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार व अन्य उद्योग उपलब्ध होऊन परिसराचा विकास होईल म्हणून, कारखाना उभासरणीला समर्थन देत स्वागत केले.

या जनसुनावणीदरम्यान स्थानिक स्तरावर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील संघर्ष प्रकर्षाने प्रगट झाला व काहीवेळ वातावरण तणावपूर्ण झाले होते. मात्र जनसुनावणी अधिकारी पद्मश्री बैनाडे यांनी वेळोवेळी हस्तक्षेप व महत्त्वाच्या सूचना करून परिस्थिती नियंत्रणात ठेवली.

> **प्रस्तावित कारखाना निर्मिती संदर्भात या जनसुनावणीच्या माध्यमातून स्थानिक ग्रामस्थांची तोंडी व लेखी स्वरूपात मते जाणून घेण्यात आली. ज्यांचा विरोध आहे, त्यांच्या विरोधामागील कारणेही समजून घेतली आहेत. या संदर्भातील सविस्तर अहवाल वरिष्ठ पातळीवर सादर केला जाईल.**
> **-पद्मश्री बैनाडे, जनसुनावणी प्रमुख व अप्पर जिल्हाधिकारी, रायगड**

## माणगावमध्ये आज जैन संघटनेचा विभागीय मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जैन संघटनेचा कोकण (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) विभागीय कार्यकर्ता मेळावा रविवारी (दि.१२) सकाळी ९ ते ११.३० या वेळेत माणगावमधील महावीर भवन येथे आयोजित करण्यात आला आहे.

संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र लुंकड, महामंत्री समप्रति जैन, प्रदेश अध्यक्ष हस्तीमल बंब, सचिव ॲड. अभय सेठिया या मेळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यात संघटनेचे राष्ट्रीय अधिवेशन, संघटनेत होणारे बदल, बीजेएस-व्हिजन २०३०, समाज उत्थान इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे.

या कार्यकर्ता मेळाव्यास रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विभागीय अध्यक्ष बाबूलाल जैन, सचिव राकेश जैन यांनी केले आहे. संघटनेचे राज्य सदस्य उत्तम जैन, रमेश बंबकी, हसमुख बंबकी, गणेश ओसवाल, डॉ. अनिल जैन, डॉ. दीपक तुपकर, जिल्हाध्यक्ष राजेश ओसवाल, दिनेश जैन, संकेत जैन, भरत पिताणी, महेंद्र गुंदेचा, दयानंद मांगले, ललित ओसवाल, डिंपल बंबकी आदि या मेळाव्यासाठी मेहनत घेत आहेत.

## माथेरान नागरी पतसंस्थेची निवडणूक जाहीर

**कर्जत : बातमीदार**

ब्रिटिश काळात भाऊसाहेब राऊत आणि भाई कोतवाल यांनी स्थापन केलेल्या माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक पदांसाठी निवडणूक जाहीर झाली असून, संस्थेच्या १३ संचालकांची निवड करण्यासाठी ११ जुलै रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणांच्या आदेशाने कर्जत तालुका सहकारी संस्था सहाय्यक निबंधकांनी माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शाम कपोते यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची घोषणा कर्जत तालुका सहाय्यक निबंधक काटकधोंड यांनी केली आहे.

माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेत संचालक पदाच्या १३ जागा असून त्यापैकी सर्वसाधारण प्रवर्गासाठी आठ तर महिलांसाठी दोन जागा राखीव आहेत. तसेच अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्त जाती जमाती प्रवर्गासाठी प्रत्येकी एक जागा राखीव आहे. माथेरान नागरी पतसंस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार नामनिर्देशन पत्र सादर करण्याची मुदत १५ जून रोजी दुपारी तीनपर्यंत आहे. नामनिर्देशन पत्रांची छाननी १६ जून रोजी करण्यात येणार असून वैध अर्जाची यादी १७ जून रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. ५ जुलैपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे.

**११ जुलैला मतदान**

आवश्यकतेनुसार ११ जुलै रोजी माथेरानमधील कम्युनिटी सेंटरमध्ये मतदान घेण्यात येणार आहे. तर मतमोजणी त्याचदिवशी घेण्यात येईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी शाम कपोते यांनी दिली.

(छाया : संतोष पेरणे)




## शेतीकामासाठी बळीराजाची लगबग सुरू

(छाया : महेंद्र खैरे)



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व शेतीच्या कामाची लगबग सुरू असून रेवदंडा परिसरात शेताची मशागत, उखळणी तसेच धान्य पेरणीच्या कामांनी वेग घेतला आहे.

मे महिना सरताच जूनच्या पहिल्याच आठवड्यात पावसाची सुरूवात होते. त्यामुळे रेवदंडा परिसरातील शेतकऱ्यांच्या मान्सुनपुर्व मशागतीच्या कामांना वेग आला आहे. शेतकरी शेतात नांगरणी, उखळणीच्या कामात व्यस्त झाले आहेत. सोबत धान्य पेरणीसुध्दा सुरू आहे. सुरूवातीच्या पावसाच्या रिपरिपीने शेतकरी सुखावले आहे. बहुतांश मान्सुनपुर्व शेतीची कामे आटोक्यात आली असून शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.

## धाटाव परिसरात दुषित पाणीपुरवठा

### नागरिकांचे आरोग्य धोक्यात, भाजपचा आंदोलनाचा इशारा

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक वसहतीच्या जलशुद्धीकरण टाकीमधून परिसरातील नागरिकांना काही दिवसापासून माती मिश्रित गढूळ पाण्याचा पुरवठा केला जात आहे. या पाण्याचा उग्र वास येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पावसाळा सुरू झाला असून, या दुषित पाणीपुरवठ्यामुळे साथीचे आजार पसरण्यची शक्यता निर्माण झाली आहे. एमआयडीसीने यात त्वरित लक्ष देऊन शुद्ध व योग्य रितीने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांतून होत आहे.

दरम्यान, धाटाव एमआयडीसीकडून परिसरातील नागरिकांना गढूळ व दुषित पाणीपुरवठा होत असून, त्याबाबत तक्रार किंवा विचारणा केली असता संबधित अधिकारी जाणुनबुजून दुर्लक्ष करतात, असा आरोप भाजप युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांनी केला आहे. संबंधित विभागाने योग्य ती काळजी घेऊन परिसरातील नागरिकांना शुद्ध व सुरळीत पाणीपुरवठा करावा, अन्यथा भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्या नेतृत्वाखाली जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा अमित घाग यांनी दिला आहे.

> **धाटाव ग्रामपंचायतीने गढूळ व दुषित पाणीपुरवठ्याबाबत लेखी पत्र दिले आहे तसेच काही कारखान्यांनीसुद्धा तक्रारी केल्या आहेत. जलशुद्धीकरण टाकीमधील एका जाळीमध्ये गाळ साठला होता तो साफ काम चालू आहे. हे काम लवकरच पुर्ण होईल. त्यानंतर शुद्ध व स्वच्छ पाणी उपलब्ध होईल.**
> **-एम के जाधव, उपअभियंता, धाटाव औद्योगिक वसाहत**

## कर्जतचे कुणाल साळवी यांच्या चित्रांचे मुंबईत प्रदर्शन






**कर्जत : बातमीदार**

येथील चित्रकार कुणाल साळवी यांच्या निसर्ग चित्रांचे प्रदर्शन मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये भरविण्यात आले असून, त्याला मुंबईकरांसह अनेक परदेशातील पर्यटकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. जहांगीर आर्ट गॅलरीमधून कुणाल साळवे यांची चित्रे अनेकांनी खरेदी केली असून आतापर्यंत सुमारे पाच लाख रुपये या चित्रप्रदर्शनातून विकली गेली आहेत.

कोकणातील सुंदर समुद्रकिनारे, हिरवीगार वनराई, पक्ष्यांचा किलबिलाट, मच्छिमार आणि त्यांच्या विविधरंगी बोटी, वेगवेगळी माणसे आणि त्यांच्या वेशभूषा, समुद्राच्या पोटात गुडूप होणार सूर्यास्त आणि त्यानंतरची भरलेली संध्याकाळ अशा अनेक विषयांवर कुणाल साळवी यांनी चित्रे साकारली आहेत. या चित्रांचे प्रदर्शन मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये ६जूनपासून सुरू असून त्याला जाणकारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.





## कर्जतच्या पोलीस निरीक्षकपदी के. डी. कोल्हे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या निरीक्षकपदी के. डी. कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी ८ जून रोजी पदभार स्वीकारला आहे.



कर्जत पोलीस ठाण्याच्या निरिक्षक सुवर्णा पत्की यांची ८ जून रोजी तडकाफडकी बदली करण्यात आली. त्यांच्या जागी रायगड जिल्हा पोलीस मुख्यालयातील निरीक्षक के. डी. कोल्हे यांना कर्जत येथे पाठविण्यात आले आहे. ३० वर्ष सेवा झालेल्या कोल्हे यांनी यापूर्वी वसई, विरार पोलीस ठाण्यात काम केले आहे.

## बारावीत माणगावच्या निकम कॉलेजमध्ये खुशबू जैन प्रथम

**माणगाव : प्रतिनिधी**

बारावी परीक्षेत माणगाव येथील एस. एस. निकम ज्युनिअर सायन्स कॉलेजचे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून खुशबू हिराचंद जैन हिने ८५.८३ टक्के गुण मिळवून करून कॉलेजमध्ये पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला. आयुष दिनेश पारधी (८४.८३ टक्के) याने दूसरा तर फातिमा दाऊद मापकर (८२.८३ टक्के) हिने तिसरा क्रमांक मिळविला.

निकम ज्युनिअर सायन्स कॉलेजचे ४४ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी १५ विद्यार्थी विशेष श्रेणीत, २९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे पदाधिकारी तसेच निकम इंग्लिश स्कुल माणगावच्या प्राचार्या, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

(छाया : संजय करडे)




## कोस्टल कोकण संस्थेतर्फे मुरूड तालुका सुपारी संघ सन्मानित

**मुरुड : प्रतिनिधी**

कोस्टल कोकण, मुंबई या संस्थेच्या कोस्टल कोकण या मासिकाचे नुकतेच दादर मुंबई येथील स्वातंत्रवीर सावरकर सभागृहात प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात कोकणाच्या प्रगतीसाठी सातत्याने चांगले काम करणाऱ्या संस्था तसेच व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये मुरूड तालुका सहकारी सुपारी संघाचा समावेश आहे.

मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची कोट्यावधी रुपयांची उलाढाल असून स्थानिक लोकांना रोजगार देणारी ही संस्था आहे. सभासदांच्या सुपारीला चांगला भाव मिळवून देण्यासाठी संस्थेचे सर्व सभासद नेहमीच प्रयत्नशील असतात. या कार्याची दखल घेऊन कोस्टल कोकण यांनी मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाला सन्मानित केले.

या वर्षी मुरूड तालुका सुपारी संघाने सभासदांच्या सुपारीला जो विक्रमी भाव दिला, त्याबद्दल आमदार नितेश राणे यांनी संघाचे कौतुक केले. संघाचे चेअरमन महेश भगत, नियंत्रण मंडळ अध्यक्ष संजय गुंजाळ, संचालक जगदीश पाटील, प्रमोद मसाल, नाना गुरव, राजेंद्र भायदे यांनी पुरस्कार स्वीकारला.

या कार्यक्रमाला अभिनेते संदीप कुलकर्णी, अशोक दुभाडे, अनंत भालेराव, प्रदीप मांजरेकर व रचना लचके बागवे, अमित बागवे आदी उपस्थित होते.

### खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा

# ज्युडोपटू मिथिला आणि मल्लखांब संघाला सुवर्ण

## जलतरणात आन्याला रौप्यपदक; खो-खो संघांचाही विजय

**पंचकुला : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत शुक्रवारी (दि. १०) महाराष्ट्राच्या मिथिला भोसलेने ज्युडोमध्ये वैयक्तिक आणि मल्लखांब चमूने सांघिक अशी दोन सुवर्णपदके कमावली. त्यामुळे महाराष्ट्राची सुवर्णपदकांची संख्या ३४ पर्यंत उंचावली आहे. महाराष्ट्राने अद्यापपर्यंत ३४ सुवर्ण, २९ रौप्य आणि २५ कांस्य अशी एकूण ८८ पदके कमावली आहेत.

महाराष्ट्राच्या मल्लखांबपटूंनी मुलांच्या गटात सांघिक सुवर्णपदक मिळवले. महाराष्ट्राच्या विजेत्या संघाला १२६.४५ गुण मिळाले. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या मध्य प्रदेशने १२६.४० गुणांपर्यंत कडवी झुंज दिली. तिसऱ्या स्थानावर राहिलेला छत्तीसगडचेही १२४.५० गुण होते. या संघामध्ये अवधूत पिंगळे, ऋषभ गुगळे, अथर्व कोंडविलकर, चेतन मानकर, मुग्रान पाठारे, अमेय सूर्यवंशी यांचा समावेश होता. ४० किलो वजन गटात मिथिला भोसलेने ज्युदोमधील दुसरे सुवर्णपदक महाराष्ट्राला मिळवून दिले. तिने अंतिम सामन्यात गुजरातच्या अर्चना नाघेरावर विजय मिळवला.

जलतरणात रिले आणि वैयक्तिक प्रकारात बहुतांशी खेळाडूंना एक-दोन सेकंदांच्या फरकामुळे पदकांनी हुलकावणी दिली. आन्या वालाने रौप्यपदक




पटकावले. तिलाही एका सेकंदामुळे सुवर्णपदकाने हुलकावणी. महाराष्ट्राच्या दोन्ही खो-खो संघांनी यजमान हरयाणाला धूळ चारली. मुलांच्या संघाने १५-११ असा एक डाव व ४ गुणांनी मात केली, तर मुलींनी ११-१० असा एक डाव व एक गुणाने विजय मिळवला. मुलांच्या लढतीत सुफियान शेख आणि रोहन कोरे महाराष्ट्राच्या विजयाचे शिल्पकार ठरले. याशिवाय किरण वसावे, नरेंद्र कातकडे आणि आदित्य कुदळे यांनी महत्त्वाचे योगदान दिले. मुलींमध्ये अश्विनी शिंदे, जान्हवी पेठे, संपदा मोरे, दीपाली राठोड यांनी विजयात महत्त्वाचे योगदान दिले.

महिला टेनिसमध्ये एकेरीत महाराष्ट्राच्या आकांक्षा नित्तुरेने वैष्णवी अडकरला ६-२, ६-४ असे नामोहरम केले, तर दुहेरीत तमिळनाडूच्या लक्ष्मी प्रभा आणि जाननी रमेश जोडीने रुमा गायकलवारी आणि आकांक्षा जोडीचा ६-४, २-६, ११-९ असा पराभव केला.

## राष्ट्रकुल स्पर्धेतून मेरीची माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची अनुभवी बॉक्सिंगपटू एमसी मेरी कोमने पायाला झालेल्या दुखापतीमुळे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतून माघार घेतली आहे. सहा वेळा विश्वविजेत्या मेरीला दुखापतीमुळे निवड चाचणी स्पर्धेतील ४८ किलो वजनी गटातील उपांत्य सामना अर्धवट सोडावा लागला. त्यामुळे हरयाणाच्या नितूला अंतिम फेरीसाठी पुढे चाल देण्यात आली.

इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये सुरू असलेल्या निवड चाचणी स्पर्धेत ३९ वर्षीय मेरीच्या डाव्या पायाला झालेल्या दुखापतीमुळे तिला खेळताना समतोल साधणे कठीण गेले. मग हा सामना थांबवून सामनाधिकाऱ्यांनी नितूला विजयी घोषित केले, तर मेरीला विविध चाचण्यांसाठी रुग्णालयात नेण्यात आले.

## स्पोर्ट्स फॉर ऑलमध्ये विद्याभवनची बाजी

**नवी मुंबई : बातमीदार**

स्पोर्ट्स फॉर ऑल या नवी मुंबई महानगरपालिका आयोजित उपक्रमांर्गत फिटनेस आणि योगा या स्पर्धांमध्ये नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाने आपला ठसा उमटवला.

नवी मुंबई महानगरपालिका आयोजित स्पोर्ट्स फॉर ऑल अंतर्गत कराटे स्किल, फुटबॉल स्कील, चेस, फिटनेस आणि योगा आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. २६ फेब्रुवारी रोजी राजीव गांधी स्टेडियम बेलापूर येथे प्रत्यक्ष योगाची स्पर्धा घेण्यात आली होती. ८ जून रोजी नवी मुंबई महानगरपालिका राजीव गांधी स्टेडियम बेलापूर येथे बक्षीस वितरण समारंभ झाला. जिल्हा क्रीडा अधिकारी आर. एच. गुरव यांच्या हस्ते पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन शैक्षणिक संकुल नेरूळचे संचालक दिनेश मिसाळ यांना खुल्या गटात योगा स्पर्धेमध्ये प्रथम बक्षीस मिळाल्याबद्दल सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व ३००० रु., १७ वर्षांखालील फिटनेस स्पर्धेमध्ये दीक्षा आहेर हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक, सन्मानचिन्ह, ३००० रु. देऊन गौरविण्यात आले, तसेच १७ वर्षांखालील योगा स्पर्धेमध्ये गौरव मिसाळ या विद्यार्थ्यास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व २००० रु. तर समर्थ धुमाळ यांस १२ वर्षांखालील योगा स्पर्धांमध्ये तृतीय पारितोषिक सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व १००० रु. देऊन गौरविण्यात आले.

पुणे विद्यार्थीगृहाचे माजी कार्याध्यक्ष कृ. ना. शिरकांडे, संचालक राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका राजकुमारी इंदलकर, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर तसेच सर्व शिक्षकांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

### नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा

## मामेदेरोव्हकडून पराभवामुळे आनंदची तिसऱ्या स्थानी घसरण

**स्टॅव्हंगर (नॉर्वे) : वृत्तसंस्था**

भारताचा दिग्गज बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदला नॉर्वे स्पर्धेच्या पारंपरिक विभागातील आठव्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. अझरबैजानच्या शख्रियार मामेदेरोव्हने आनंदला पराभूत केले. त्यामुळे त्याची गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी घसरण झाली आहे.



आनंदने या स्पर्धेची दमदार सुरुवात केली होती. पाचव्या फेरीअंती तो गुणतालिकेत नॉर्वेचा जगज्जेता मॅग्नस कार्लसनसह संयुक्तरित्या अग्रस्थानावर होता, मात्र आठव्या फेरीच्या लढतीत मामेदेरोव्हने आनंदवर २२ चालींमध्येच सरशी साधली. यामुळे आनंद १३ गुणांसह तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. स्पर्धेची एक फेरी शिल्लक असताना कार्लसन १५ गुणांसह अग्रस्थानी कायम असून मामेदेरोव्ह १४.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे.

कार्लसनने आठव्या फेरीच्या लढतीत फ्रान्सच्या मॅक्सिम वाशिये-लॅग्रेव्हला नमवले. या दोघांमधील नियमित लढत ७९ चालींअंती बरोबरीत सुटली. त्यानंतर बरोबरीची ही कोंडी फोडण्यासाठी झालेल्या अर्मागेडन डावात कार्लसनने ५४ चालींमध्ये विजयाची नोंद केली. अन्य लढतींमध्ये बल्गेरियाच्या व्हेसेलिन टोपोलोव्हने अमेरिकेच्या वेस्ली सो याचा, तर अझरबैजानच्या तैमूर राजाबोव्हने चीनच्या हाओ वांगचा पराभव केला.

## पनवेलमध्ये स्केटबोर्डिंग स्पर्धेला खेळाडूंचा प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

स्केटबोर्डिंगची स्पर्धा पनवेलमध्ये प्रथमच झाली. या स्पर्धेला खेळाडूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

स्केटबोर्डिंग हा खेळ १९५०मध्ये कॅलिफोर्निया येथे सुरू झाला, पण त्यानंतर काही काळ कमी झालेली प्रसिद्धी १९७५मध्ये पुन्हा वाढली. टोकियो २०२० ऑलिम्पिक्समध्ये पहिल्यांदा या खेळाची सुरुवात झाली. पनवेलमध्ये स्केटबोर्डिंग सुरू केला पाहिजे हा विचार घेऊन अर्चिस व ओंकार या दोन तरुणांनी योगदान दिले आहे.

नुकत्याच झालेल्या स्केटबोर्डिंग स्पर्धेत ४० लहान मुलांनी भाग घेतला होता. वयोगट ३ ते ७मध्ये प्रथम पारितोषिक दुनाया शाह (७), द्वितीय पारितोषिक त्रिशा सोलंकी (७), तृतीय पारितोषिक श्रेयांक चव्हाण (३), वयोगट ८ ते १० प्रथम पारितोषिक युवराज वावा (९), द्वितीय पारितोषिक औक्श पटणे (९), तृतीय पारितोषिक साम्य लोहार (९), वयोगट ११ ते १४ प्रथम पारितोषिक टेनिका शाह (१२), द्वितीय पारितोषिक मयंक तांबोळी (१२), तृतीय पारितोषिक शौर्य पटणे (१२) यांनी पटकाविले. त्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत संजीवनी जाधवला सुवर्णपदक

**चेन्नई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या संजीवनी जाधवने वरिष्ठ राष्ट्रीय आंतरराज्य ॲथलेटिक्स स्पर्धेत महिलांच्या १० हजार मीटर शर्यतीत सुवर्णपदक कमावले, तर प्राजक्ता गोडबोले हिने रौप्यपदक पटकावले आहे.

२५ वर्षीय संजीवनीने ३३:१६.४३ सेकंद, तर प्राजक्ताने ३३:५९.३४ सेकंद अशी वेळ नोंदवली. एप्रिल महिन्यात झालेल्या फेडरेशन चषक स्पर्धेत तिने सुवर्णपदक मिळवताना यापेक्षा तीन सेकंदांनी उत्तम अशी ३३:१३.०७ सेकंद अशी वेळ



गाठली होती, मात्र राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी पात्रतेची ३१ मिनिटांची वेळ नोंदवण्यात ती अपयशी ठरली आहे. या प्रकारात उत्तर प्रदेशच्या कविता यादवने (३५:००.३३ से.) कांस्यपदक पटकावले.

**बंदीच्या दोन वर्षांत मी बरेच काही शिकले. बंदी असलेले पदार्थ मी जाणीवपूर्वक सेवन केले नव्हते. त्यामुळे माझी चूक नव्हती. अन्न किंवा औषध अशा कोणत्याही पदार्थांचे सेवन करताना सावध राहायला हवे.**

**–संजीवनी जाधव**

लांब उडीपटू एम. श्रीशंकरने पात्रता फेरीतील अखेरच्या प्रयत्नात ८.०१ मीटरसह राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. या प्रकारात प्रेम कुमारने २०१३ मध्ये ८ मीटर अंतर गाठले होते.

## आयपीएल प्रसारण हक्क लिलावातून 'ॲमेझॉन'ची माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटच्या रविवारपासून सुरू होणाऱ्या प्रसारण हक्क लिलावाच्या शर्यतीतून जेफ बेझोस यांच्या ॲमेझॉनने माघार घेतली आहे. त्यामुळे प्रसारण हक्कांसाठी प्रामुख्याने स्टार, व्हायकॉम १८, सोनी आणि झी या चार मोठ्या समुहांमध्ये स्पर्धा आहे.

जगातील सर्वात श्रीमंत उद्योगपतींच्या यादीत असलेले बेझोस (ॲमेझॉन) आणि मुकेश अंबानी (व्हायकॉम १८) यांच्यात आयपीएल प्रसारण हक्क मिळवण्यासाठी द्वंद्व अपेक्षित होते. डिजीटल माध्यमांचे हक्क मिळवण्यासाठी ॲमेझॉनला प्रबळ दावेदार मानले जात होते, मात्र त्यांनी कोणतेही कारण न देताच या शर्यतीतून माघार घेतली आहे. या ई-लिलाव प्रक्रियेत २०२३ ते २०२७ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी चार विभागांमध्ये प्रसारण हक्क दिले जाणार आहे. अ-विभागात भारतीय उपखंडातील टीव्ही हक्क, ब-विभागात भारतीय उपखंडासाठी डिजीटल माध्यमांचे हक्क, क-विभागात डिजीटल माध्यमांमध्ये प्रत्येक हंगामात निवडक १८ सामने आणि ड-विभागात परदेशातील टीव्ही व डिजीटल हक्कांसाठी लिलाव होणार आहे.

## चार वेळा प्रयत्न करूनही फलंदाजांना धावबाद करण्यात अपयश; व्हिडीओ व्हायरल

**लंडन : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या क्षेत्ररक्षणात चुका करणे एका अर्थाने मोठा गुन्हा ठरू शकतो. अशा स्थितीत जर एखाद्या खेळाडूला धावबाद करण्यासाठी चार-चार संधी मिळूनही त्यात यश आले नाही, तर युरोपियन क्रिकेट स्पर्धेमध्ये असाच एक किस्सा घडला आहे.

युरोपियन क्रिकेट लीगमधील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओत असे दिसते की, खेळपट्टीवरील फलंदाज पुढे येऊन कव्हरच्या दिशेने खेळण्याचा प्रयत्न करतो, परंतु त्याचा अंदाज चुकतो आणि चेंडू यष्टीरक्षकाच्या हातात जातो. दरम्यान, नॉन स्ट्राईकर फलंदाज धाव घेण्यासाठी धावू लागतो. त्याचवेळी यष्टीरक्षक त्याला धावबाद करण्यासाठी चेंडू फेकतो, पण त्याचा नेम चुकतो. त्यानंतर तो पुन्हा चेंडू उचलतो आणि गोलंदाजीकडे फेकतो. गोलंदाजालाही योग्य वेळी तो चेंडू पकडता येत नाही. या दरम्यान दोन्ही फलंदाज दुसरी धाव घेण्यासाठी धावू लागतात. खराब क्षेत्ररक्षणाचा हा प्रकार इथेच थांबत नाही. गोलंदाज पुन्हा चेंडू स्ट्रायकरच्या बाजूला फेकतो, तर तिथे उभ्या असलेल्या क्षेत्ररक्षकाला चेंडू पकडता येत नाही. दोन्ही फलंदाज तिसरी धावही घेतात. अशा पद्धतीने १५ यार्ड सर्कलच्या बाहेर चेंडू न टोलावताही फलंदाजाला तीन धावा मिळतात.

फॉक्स क्रिकेटने आपल्या इन्स्टाग्रामवर अकाउंटवर हा व्हिडीओ शेअर केला आहे. 'त्यांनी तीन धावा कशा चोरल्या', अशा कॅप्शनसह हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या मजेशीर व्हिडीओवर सोशल मीडिया युजर्सनी मजेशीर कमेंट केल्या आहेत. यांच्यापेक्षा तर गल्ली क्रिकेटमधील खेळाडू चांगले क्षेत्ररक्षण करतात, अशी कमेंट एकाने केली आहे. आणखी एका व्यक्तीने कमेंट केली आहे की, आजपर्यंत मी यापेक्षा चांगले क्षेत्ररक्षण पाहिले नाही.






## पाकिस्तानच्या कर्णधारामुळे संपूर्ण संघावर झाली कारवाई



**मुलतान : वृत्तसंस्था**

कर्णधार बाबर आझमच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानच्या संघाने नुकत्याच वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या एकदिवसीय मालिकेत विजय मिळवला, मात्र याच मालिकेच्या शेवटच्या सामन्यात कर्णधार आझमने मैदानात असे कृत्य केले की, त्याचा भुर्दंड संपूर्ण संघाला भरावा लागला.

पाकिस्तान आणि वेस्ट इंडिजदरम्यान दोन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवण्यात आली. त्यातील दुसरा आणि शेवटचा सामना शुक्रवारी मुलतानमध्ये झाला. हा सामना पाकिस्तानने १२० धावांनी जिंकला, पण या सामन्यादरम्यान कर्णधार बाबर आझमने एक अशी चूक केली ज्याची शिक्षा संपूर्ण संघाला भोगावी लागली. वेस्ट इंडिजची फलंदाजी सुरू असताना मोहम्मद नवाजने २९वे षटक टाकले. त्या वेळी विंडीजचा अल्झारी जोसेफ स्ट्राईकवर होता. त्याने नवाजचा पहिला चेंडू डाव्या बाजूला टोलावला आणि एक धाव घेण्यासाठी पळाला. यानंतर क्षेत्ररक्षकाने चेंडू यष्ट्यांच्या दिशेने फेकला. हा चेंडू क्षेत्ररक्षणासाठी उभ्या असलेल्या बाबरने अडवला, पण हे करताना त्याने यष्टीरक्षण करण्याच्या हातमोज्यांचा वापर केला.

बाबरची ही कृती क्रिकेटच्या नियमानुसार योग्य नव्हती. क्रिकेटचे नियम बनवणारी संस्था मेरीलेबोन क्रिकेट क्लबने याबाबत स्पष्ट नियमावली तयार केलेली आहे. या नियमावलीतील नियम २८.१ नुसार यष्टीरक्षकाशिवाय कोणत्याही क्षेत्ररक्षकाला हातमोजे किंवा बाह्य लेग गार्ड घालण्याची परवानगी नाही. २९व्या षटकादरम्याने बाबरने नेमके तेच केले. त्यामुळे पंचांनी संपूर्ण पाकिस्तानच्या संघाला शिक्षा दिली. पंचांनी पाकिस्तानच्या संघाला दंड म्हणून वेस्ट इंडिजच्या संघाला अतिरिक्त पाच धावा दिल्या.

## प्रज्ञानंदची विजयी घोडदौड

**नॉर्वे : वृत्तसंस्था**

भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदने चमकदार कामगिरी करणे सुरूच ठेवले आहे. १६ वर्षीय प्रज्ञानंदने शुक्रवारी (दि. १०) नॉर्वे बुद्धिबळ अ खुली स्पर्धा जिंकली. आर. प्रज्ञानंदने एकूण ९ फेऱ्यांमध्ये ७.५ गुण मिळवून ही कामगिरी केली. शेवटच्या सामन्यात प्रज्ञानंदने आपला देशबांधव व्ही. प्रणीतचा पराभव करून विजेतेपद पटकावले आहे.

प्रज्ञानानंद गेल्या काही काळापासून उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. त्याने दुसऱ्यांदा विश्वविजेता मॅग्नस कार्लसनचा पराभव केला आणि चेसबल मास्टर्सच्या अंतिम फेरीत चीनच्या डिंग लिरेनकडून पराभव पत्करावा लागला.

चेन्नईचा रहिवासी असलेल्या प्रज्ञानानंदने २०१८ मध्ये प्रतिष्ठित ग्रँडमास्टरचे विजेतेपद मिळवले होते. ही कामगिरी करणारा प्रज्ञानंद हा भारतातील सर्वात तरुण खेळाडू होता, आणि जगातील दुसरा सर्वात तरुण खेळाडू होता. प्रज्ञानंद सर्वात तरुण ग्रँडमास्टर्सच्या यादीत पाचव्या क्रमांकावर आहे. भारताचा दिग्गज बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद याने या खेळाडूला मार्गदर्शन केले आहे. ग्रँडमास्टर झाल्यापासून प्रज्ञानंदने सातत्याने प्रगती केली पण त्यानंतर कोविड-१९ महामारीमुळे अनेक स्पर्धा थांबल्या होत्या.

प्रज्ञानानंदने वयाच्या १२ वर्षे ग्रँड मास्टरची पदवी संपादन केली आहे. तो भारताचा सर्वात तरुण ग्रँड मास्टर आहे. त्याच वेळी २०१८ मध्ये तो जगातील दुसरा सर्वात तरुण ग्रँडमास्टर होता. त्याच्या आधी केवळ युक्रेनचा सर्गेई कर्जाकिन हा १९९० मध्ये वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी ग्रँडमास्टर झाला होता.






हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✻ E-mail : ramprahar@gmail.com ✻ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**